म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ५१२७

# …याचा
# प्रभात-काल

अनुवादक,
…जी पेंडसे.

REFBK-0002042

किंमत १२ आणे.

(महर्षि अरविंद बाबू यांच्या Dawn over Asia चा अनुवाद.)

# एशियाचा प्रभात-काल.

REFBK-0002042

अनुवादक,

**लालजी पेंडसे.**

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. 2042

प्रथमावृत्ति.

ता. २६ ऑगष्ट सन १९२२.

किंमत १२ आणे.

मुद्रकः—रा. रा. चिंतामण सखाराम देवळे, मुंबईवैभव प्रेस,
सँढर्स्टरोड, गिरगांव-मुंबई.

प्रकाशकः—रा. रा. रघुनाथ दिपाजी देसाई, हनुमान बिल्डींग नं. ५
खोली नं. १३, लॅमिंग्टन रोड-मुंबई.

श्री.

# स्वतः संबंधीं.

पुस्तक म्हटलें कीं त्याला लेखकाची प्रस्तावना ही अत्यावश्यक होऊन बसली आहे. लेखकानें प्रस्तावना लिहिणें हा शिष्टाचार असो, पुस्तकांतील तात्पर्यभाव थोडक्यांतच पण प्रामुख्यानें वाचकाच्या दृष्टीस आणण्याचें साधन म्हणून असो-किंवा पुस्तकांत ग्रथित केलेल्या विचारसरणीबद्दल त्यास स्वभावतःच वाटणाऱ्या भावनात्मक महत्वाची कैफियत म्हणून असो; कसेंहीं असलें तरी वरील पैकीं अंशतः प्रत्येक प्रकारामुळें साधारणतः ही अवश्यकता उत्पन्न झालेली असते ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं.

तथापि ह्या प्रकारांपैकीं पुस्तकाच्या दृष्टीनें महत्वाचें असें जें साधन तें डॉ. सावरकर सारख्या प्रतिभासंपन्न लेखकाच्या काव्यमय पण मार्मिक लेखणीद्वारें वाचकांस उपलब्ध झालेलें आहे. महत्वाची कैफियत म्हणून मी हें भावनाविष्करण करीत असेन असें म्हटलें, तर ज्या भावनांची उर्मि प्रस्तुत पुस्तकांत प्रतिबिंबित झाली आहे तीहि माझी स्वतःची नव्हेच; अर्थात् उरला प्रकार एक; आणि तो म्हणजे शिष्टाचार! कित्येक गोष्टींत शिष्टाचार अनुलंघनीय असतो; आणि तोच मजकडून प्रस्तुत कार्य करवून घेत आहे.

शिष्टाचाराचा हा प्रबंध पाळण्यांत देखील मला एक प्रकारचा आनंद मात्र वाटतो हेंहि नाकबूल करून चालणार नाहीं. प्रस्तुत पुस्तकांत प्रकर्षित झालेल्या विचार किरणांची उज्वलता वाचकांच्या निदर्शनास आणण्याच्या हेतूनें इतस्ततः प्रयत्न करण्यापेक्षां पॉल रिशाद यांचे विचार महर्षि अरविंद बाबू सारख्या पुरुषांस देखील इंग्रजी भाषेंत उमटविण्याचा मोह उत्पन्न झाला, ही एकच गोष्ट नमुद करणें अधिक संयुक्तिक होय. चैतन्य निर्विकार असून आपला साक्षात्कार पटवीत असतें. असें असून देखील प्रत्येक गोष्टीचा कर्ता, कार्यकारण भाव आणि साधनें हीं एकत्रित झालीं म्हणजेच कोणत्याहि कृतीला दृश्य स्वरूप येत असतें. या दृष्टीनें, सुमंगलप्रकाशानें महाराष्ट्र वाङ्मयसृष्टि विनटीत व्हावी, म्हणून अंधःकाराचें अवजड कुलूप उघड-

ण्याची डॉ. सावरकरांची चांदीची किल्ली–हो प्रभात, ती महाराष्ट्र सारस्वतांच्या हातीं देण्यांस मी निमित्तमात्र–साधनरूप होत आहे; ह्या कारणापुरताच मला साभिमान आनंद वाटतो.

आध्यात्मिक तत्वज्ञान हें जर निवृत्तिपर असतें तर जगाचें प्रगमन केव्हांच खुंटलें असतें; परंतु ते प्रवृत्तिपर असून अभिजात् भावनांना जागृत करून आत्म्याच्या अमुप सामर्थ्याचा साक्षात्कार मानवी प्राण्यांस पटवीत असते; आणि म्हणूनच व्यक्तिगत् प्रपंचाचा सन्यास केलेले अनेक ऋषीमूनि, साधूसंत व ज्ञानज, हे सर्व मानवी समाजाचा, राष्ट्राचा, किंवा जगाचाहि संसार करण्यांत मग्न झालेले असतात.

आज अखिल भारतवर्ष स्वातंत्र्याच्या वृत्तिनें भारलें जाऊन, हृदया हृदयांतून त्या प्रवृत्तिचा पडसाद उमटत आहे; कदाचित साम्राज्यांतर्गत, तर कदाचित तद्‌बाह्य अशा ह्या भावी स्वराज्याची उभारणी–इंग्लंडची शासनपद्धति, तुलनात्मकदृष्ट्या श्रेष्ठ ठरली तरी ती निर्लेप व निर्दोष मात्र खास नव्हे, अर्थात्–निराळ्या तऱ्हेनेंच करावयाची, अशी भाषा राष्ट्र–मुखांतून ध्वनित होत आहे. अशा वेळीं प्रस्तूत पुस्तकांतील ' लोक–शासन ' हा भाग अत्यंत बोधप्रद व मननीय होय यांत शंका नाहीं. इंग्लंडच्या प्रजा–प्रतिनिधित्वाचें खरें स्वरूप पार्लमेंटातील धनिकांचें व्यक्तिवर्चस्व (The Parliamentary Plutocratic Individualism) हेंच होय; त्यामुळें सर्व साधारण हक्कांची विटंबना, धनिक व मजूर या दरम्यान प्रत्यहि वाढत जाणारी तेढ, ह्यामुळें बेकारी वाढत जाऊन अहर्निष वृद्धिंगत होणारा प्रजा–प्रक्षोभ; अशा दुष्परिणामाचें मार्मिक आविष्करण उपरोक्त भागांत झालेलें आहे. आठवा भाग हा तर अहमदावाद येथील राष्ट्रीय सभेस उद्देशून आहे. परसत्तेच्या घातूक बंधनानें बद्ध झालेल्या गुलाम राष्ट्रा ! पॉल रिशाद सारखा तत्ववेत्ता तुला तुझें उच्चस्थान दाखावित आहे. तुझ्या निद्रित आत्म्यास जागृत कर; आणि आध्यात्मिक झाल्या तरी भलत्याच भावांत गुरफटून न रहातां, तुझ्या आत्म्याचा निनाद नीट ऐकून पॉलसारखा पाश्चिमात्य मित्र आग्रहानें वजावित आहे तें उत्तुंगपद प्राप्त करून घे.

प्रचलित सुधारणेच्या स्त्रैण नटवेगिरीनें अंधानुकरणपटू बनलेल्या राष्ट्राचे चैतन्यहीन नेत्र उघडण्यास तिसऱ्या भागांतील ज्वलत् अंजन पुरे आहे. आज विसाव्या शतकांतील केवळ अद्भूत चमत्कार म्हणून मानल्या जाणाऱ्या कित्येक सुधारणा आमुलाग्र पाशवीच होत. तसेंच जपान व अमेरिकेचा दृष्टांत देऊन अनुकरणामुळें

ओढवणाऱ्या भयंकर संकटांची अगामी सूचना प्रस्तुत भागांत दिली गेली आहे. त्याचप्रमाणें भांडवलशाही व मजुरसंघ यांच्या चालू असलेल्या विकोपासंबंधाचे जातक–वर्णन ह्या भागांत आलेलें आहे.

सातवा भाग महर्षि अरविंद बावू यांच्या जीवन–चारित्राबद्दल असून, पॉल रिशाद म्हणतात त्याप्रमाणें हा पुरुष खरोखरच जगाचा शास्ता होणार त्या कल्पनेनें प्रत्येक भारतीयाचें अंतःकरण आनंदातिशयानें व स्वाभिमानानें महिरून जाईल. तसेंच पांचवा व सहावा भाग हे बुद्धि–विचक्षण लोकांस आश्चर्यमूढ, तर, भाविक भक्तांस उद्यांच्या ह्या हृदयंगम कल्पनेनें तरंगीत करतील.

तथापि प्रथम आणि द्वितीय भाग हे माझ्या दृष्टीला अधिक महत्वाचे व व्यवहारिक दिसतात. आज अधिकारमदानें धुंद झालेल्या कित्येक पाश्चिमात्यांस आम्हां एशियाटिकांचा संपर्कहि सहन होईनासा झाला आहे. ' Asiatics Must go ' ही त्यांची कुटील राजनीतिची घोषणा आहे. हें असें होणारच, आणि म्हणून एशियांतील सर्व राष्ट्रांनीं एकमुखी एक आत्मीय व्हावें, असा अत्यंत उपयुक्त इषारा पॉल रिशाद यांनी तनि वर्षांपूर्वीच देऊन ठेवला आहे. अर्थात् ह्या दूर दृष्टीचा वेध डॉक्टर साहेबांनी सूचित केल्याप्रमाणें भारतवर्षाच्या स्वातंत्र्यमंदिराच्या उत्तुंग शिखरावरूनच घेतला पाहिजे हें मात्र अक्षरशः खरें आहे.

ह्याशिवाय माझ्या मतें नमूद करण्यासारखे कित्येक मुद्दे मला स्थलाभावीं सोडून द्यावे लागतात, ह्याबद्दल मला वाईट वाटतें परंतु माझा सर्वस्वी नाइलाज आहे. तसेंच प्रस्तूत पुस्तकांत जर कांहीं विषमता वा न्यूनता राहिली असेल तर तिला मीच जबाबदार आहें. मुळ पुस्तकापर्यंत तो दोष पोंचविणें योग्य होणार नाहीं. अथवा पहिला प्रयत्न असाच ओबडधोबड असणार !

ता. २६ ऑगस्ट १९२२.
२४ तारापोरवाला बिल्डिंग,
खंबाला हिल–मुंबई.

आपला नम्र,
**लालजी पेंडसे.**

# प्रथमचे दोन शब्द.

प्रभात म्हणजे सर्व अंधःकाराचा शेवट. प्रभात म्हणजे स्तब्ध झालेल्या प्रकाश समुद्रावर उसळलेली पहिली उर्मी. चोर, दरवडेखोर, वाटमारे, यांच्या अंधःकारांतील दुष्ट कृत्यांना बंद पाडून त्यांना हटकावणारा प्रकाशाच्या राज्यांतील पहिला पहारेकरी म्हणजे प्रभात. मायावी कमलिनींमध्यें भुरळ पडून रात्रीं बंदिवान् झालेल्या भ्रमरांना बंदीचे दरवाजे किलकिले करून कोमल प्रकाश किरणांनीं त्यांना आनंदाच्या गुदगुल्या करणारी मुक्तीची पहिली सखी म्हणजे प्रभात. स्वर्गातून अवनीतलावर अवतरण करून फुलांफुलांना मोत्यांचे अलंकार चढविणाऱ्या हिमबिंदूंचे नाजूक विमान म्हणजे प्रभात. उमलत्या कळ्यांचें प्रथम हास्य म्हणजे प्रभात. प्रभात म्हणजे नवी आशा, नवा प्रकाश, नवें जीवन. प्रकाशमय भविष्यकाळाच्या दरवाज्यावरचें अंधःकाराचें जड कुलुप खाड्कन उघडणारी चांदीची किल्ली म्हणजे ही प्रभात. अंधःकारांमध्यें विगत जीवन झालेल्या ज्या हतभागी देशांवर ही उजाडते ते देश धन्य होत !

अशाच आजच्या कांहीं धन्य झालेल्या देशांपैकीं हिंदुस्थान हा एक देश आहे. आज सबंद एशियाच्या क्षितिजावरच नवीन जीवनाची प्रभात उदित झाली आहे. कित्येक शतकें मोहमय निद्रेंत गेल्यानें ह्या आशिया खंडांत जिकडे तिकडे अज्ञानाचा अंधःकार पडला होता; व अंधःकारांत घडणारे सर्व पैशाच्ची, पाशवी व अमानुष अन्याय येथें चालले होते. सर्व जगाला परमेश्वरप्राप्तीचे मार्ग आंखून देण्याकरतां भगवान् बुद्ध देवापासून तो खिस्त महंमदापर्यंत धर्मप्रणेते जन्माला घालून ही एशियाची दिव्यभूमि झोंपी गेली. तिनें दिलेलें ऋण, ऋणी झालेल्या मनुष्य जातीनें कसें फेडलें हें इतिहासानें नमुद करून ठेविलें आहे ! मात्र ज्यावेळीं तिची ही निद्रा पुरी व्हावयास लागली, त्यावेळीं एक प्रचंड उल्कापात झाला व जगांतल्या साम्राज्य मदानें धुंद झालेल्या राष्ट्रांनीं केलेल्या अनन्वित अन्यायाचें परिमार्जन होण्याकरितां मानवी रक्ताच्या नद्या गेल्या घोर युद्धांमध्यें वाहल्या गेल्या. हा भयंकर संहार झाल्यानंतर सर्व पाशवी सामर्थ्याची रग जिरली व आतां कांहीं तरी दैवी तेज, मार्गदर्शक झालें पाहिजे अशी तीव्र जाणीव, सुधारणेचा दंभ मिरविणाऱ्या मानवी समुहाला भासूं लागली. ही दैवी वृत्तीची जाणीव, धार्मिक प्रवृत्ती वांचून कशी सफल होणार ? व धर्माचे धडे एशियावांचून दुसरी कोणती भूमि देऊं शकणार ? जगांतील

साम्राज्यवाद्यांनो, तुम्हीं वाटेल तितका मानवजातीचा संहार करा. परंतु, दुःखविव्हल झालेल्या मानवी हृदयाला, धर्माची संजिवनी देणें तुम्हाला शक्य नाहीं. ते देण्याची तुम्हां पामरांची अवखात नाहीं. त्याला ही आजपर्यंत तुम्ही अवमानित केलेली एशियाची उदार चरिताभूमीच समर्थ आहे. व आज हें दिव्यकार्य साधण्याला सर्व एशियाभर दिव्य जागृति सुरू झाली आहे. ह्या दिव्य जागृतीची सुरवात म्हणजेच एशियावरची प्रभात. ह्या मधुर प्रभाताची जाणीव, पॉल रिशर्ड यांच्यासारख्या पाश्चात्य देशांत जन्म घेऊन, पाश्चात्य संस्कृतीमध्यें वाढलेल्या एका फ्रेंच तत्त्ववेत्याला झाली, ही एक अपूर्वच गोष्ट झाली म्हणावयाची. परंतु एशियावरच्या प्रभातकालीन दिव्य दृश्यानें हा फ्रेंच तत्ववेत्ता मोहित होऊन गेला ही गोष्ट खरी. पॉल रिशर्ड अनेक वर्षेपर्यंत जगताला तारणाऱ्या कोणत्यातरी जगदुद्धारक विभूतीचा शोध करण्यांत तल्लीन होऊन गेले होते, व अनेक देश शोधल्यानंतर त्यांना अशी एक सर्व जगाला, अखिल मानवजातीला उद्धरून नेणारी विभूति सांपडली. ही विभूति म्हणजे दुसरें कोणी नसून स्वातंत्र्योपदेशक श्री. अरविंद घोस हे होत.

पॉल रिशर्डचें हें मत, ही निष्ठा व हा निश्चय पाहून मनाला अचंबा वाटतो; व आपल्या आत्मवंचकतेचें हिडिस स्वरूप डोळयांपुढें येऊन 'तुझें आहे तुझ्यापाशीं परि तूं जागा चुकलासी' ह्या संतवचनाची प्रतीति मनाला पटते. स्वतःच्या जातींत, देशांत असलेला एक एक तेजस्वी पुरुष वास करीत असून आपण आपल्या उन्नत्तीकरतां परक्याच्या तोंडाकडे काय म्हणून पहावें? महात्मा गांधी, बाबु अरविंद यांच्या सारखी देशभक्त महात्म्यांची वसति ज्या देशामध्यें आहे त्याला आत्मोद्धरणाकरतां कशाला परजनावर अवलंबून रहाण्याची आवश्यकता वाटावी? परंतु हा सर्व परिणाम ज्या परवशतेमध्यें आपण इतकें वर्षे दडपले गेलों आहोंत त्याचाच आहे. वं ही एक अत्यंत आशादायक गोष्ट आहे कीं पुनरपि एकदां आपली, दृष्टि अंतर्मुख झाली. एका तपापूर्वी जें दिव्य स्वातंत्र्य गीत बाबु अरविंदांनीं गाइलें त्याच गीताच्या पडसादानें आज सर्व राष्ट्र भरून गेलें आहे व महात्मा गांधीच्या विश्वव्यापक उद्धाराच्या निशाणाखालीं सर्व भारत वर्ष आत्मरत होत्साता, परकीय संस्कृतीच्या दडपणाला उलथून देऊन स्वराज्य सोपान चढूं लागला आहे.

विश्वबंधुत्वाच्या व जगदुद्धाराच्या सर्व कल्पना तोंपर्यंत फोल आहेत कीं जोंपर्यंत आपण स्वतंत्र झालों नाहीं. स्वतः पंजरबद्ध असतांना, दुसऱ्यांना मुक्त कसें करतां येणार? तेव्हां सर्व एशियाला, अखिल मानवजातीला मुक्त करण्याची हांव

जर आपण धरली तर त्यांतील पहिली गोष्ट आपल्याला घडवून आणली पाहिजे, ती ही कीं आपण मुक्त झालें पाहिजे. जगाचा गुरु एशिया; परंतु एशियाचा मार्गदर्शक हिंदुस्थान. जोंपर्यंत हिंदुस्थान मुक्त नाहीं, तोंपर्यंत कितीहि जपान बलिष्ठ होवोत, ते एशियाला मुक्त करूं शकणार नाहींत. तेव्हां एशियाच्या व पर्यायानें जगताच्या उद्धाराची पहिली पायरी ह्मणजे, आपली भूमाता प्रथम बंधनरहित केली पाहिजे.

पॉल रिशर्डच्या ह्या विचारणीय व्याख्यानाचें निरीक्षण, या दृष्टीनें वाचकांनीं करावें. त्यामध्यें सांगितलेला ' जाति-समता-संघ, ' हा गेल्या युद्धानंतर स्थापन झालेल्या अधिकारलोलुप ' राष्ट्रसंघाला ' एक प्रकारचें आव्हानच आहे. आज जरी हा ' जाति-समता-संघ ' अत्यंत अल्प प्रमाणांत दिसत आहे, तरी एक काल असा येणार आहे कीं, हाच किंवा अशाच स्वरूपाचा, अखिल राष्ट्रांमधील जनतेचा ' स्वातंत्र्य-समता-बंधुता' या त्रयीच्या पायावर उभारलेला पवित्रसंघ राज्य, सत्ता, वैभव, यांच्या पायावर उभारलेल्या राष्ट्रसंघाचें थोतांड जगाच्या प्रत्ययास आणून देईल व सर्व जगासमोर फजीत व पराजीत झालेला हा अधिकारलोलुपांचा तांडा, हीनबल होऊन लोकसत्तेला शरण येईल. तो शुभ दिवस अधिकाधिक सांनिध आणण्याचा प्रथम मार्ग व हा सर्व राष्ट्रांतील जनतेचा संघ सबल करण्याचा प्रथम प्रयत्न म्हणून आपण या भारत वर्षांतील रहिवाशांनीं सर्वस्वाचेंहि दान देऊन स्वराज्य संपादन केलें पाहिजे हें विसरतां कामा नये. नाहीं तर हात पाय बांधलेल्या मनुष्यांनीं दुसऱ्यांना स्वातंत्र्याचे धडे देण्याची वल्गना करण्याप्रमाणें आपल्या विश्वोद्धाराच्या गप्पा हास्यास्पद होतील.

या दृष्टीनें या पुस्तकाचें वाचन केलें असतां त्यापासून आत्मविश्वास वाढेल, आपल्या स्वराज्य कार्याचें माहात्म्य व जगाच्या दृष्टीनें त्याची आवश्यकता लक्षांत येईल व एक परकीय देशांतील तत्ववेत्ता सर्व जगताचें पर्यटन व परीक्षण करून अखेर याच पुराणपावन हिंदभूमींत येऊन तिच्याच एका तेजस्वी पुत्राला जगदुद्धारकाचा तिलक लावतां आला, या कल्पनेनें मन धन्यतामय होऊन अधिक कार्यतत्पर होईल. इतकें जरी या पुस्तकाच्या वाचनानें प्रत्येक वाचकानें केलें, तरी भाषांतरकाराचे परिश्रम सार्थकतेला गेले असें होईल.

किर्लोस्कर भुवन.<br>
गिरगांव.<br>
ता. २६-६-१९२२

ना. दा. सांवरकर.



मशिए पॉल रिशार्.



*"Wish you descent of truth and light, fifteenth."*

*—AUROBINDA.*

ग्रंथ संग्रहालय
रा. क्र. २०७४

# महर्षि अरविंद घोष ! !

## पुज्यपाद चरणीं नम्रार्पण.

प्रथम बडोदें येथें, आणि तदनंतर सुरत कॉंग्रेस प्रसंगीं आपणांस पाहिल्यास आज किती तरी वर्षें लोटलीं ! मि. पॉल रिशाद स्वतःसंबंधीं म्हणतात त्याप्रमाणें, ईशप्राप्ती नंतरचें आपलें दिव्यदर्शन घडण्याचें महद्भाग्य ह्या बालकांस केव्हां लाभणार ?

आपल्या पुण्येतिहासानें पावन झालेली ही अल्पकृति वास्तवीक ६।७ महिन्यांपूर्वीच प्रसिद्ध व्हावयाची; तथापि जगांत वास्तवीक दिसणाऱ्या सर्वच गोष्टी प्रत्यक्ष व्यवहारांत कोठें शक्य असतात ? त्यांतून मी विश्वविद्यालयाचा पदविधर नाहीं, ही अडचण प्रस्तुत शिक्षणैक संस्थांवर बहिष्कार घालण्याच्या नवसंचारित मन्वंतराच्या दिवसांत झाली तरी किरकोळ नव्हेच !

आपला नम्र,

**लालजी पेंडसे.**

## ॥ साकीवृत्त. ॥

—१—

उत्तरायणीं राष्ट्र दिनमणी, दूत उदित हो गाजी ।
तिरस्कारिल्या हीन लोखिल्या, ऐशा देशा माजी ।
विश्वेशाच्या कृपेंकरोनी, उदया आला दूत ।
निजतेजानें सर्व जनांचीं, मनें कराया पूत ॥ १ ॥

वाचा दत्ता नरास एका, कुमारिका ती भूमि ।
नवसृष्टीचा चालक देई, नांव ' एशिया ' नामी ।
मुदित मनाचा दूत मजेचा, कुमारिकेला बोले ।
अये भगवती! विश्वेशाची, कृपा तुजवरी बाले ॥ २ ॥

तुझ्यासारखी तूंच धन्यगे, जगांतल्या या देशीं ।
विश्वाचा या चालक पालक, केवळ तुझिया पाशीं ।
ती भयचकिता बाला पाहुनी, राष्ट्राच्या दूताला ।
दर्शन याचें भव्य अहाहा! काय वदूं मी याला ॥ ३ ॥

अये एशिये भिउं नकोगे देवदूत तो बोले ।
भविष्य केवळ तुझिया हातीं, प्रसाद होय विलोले ।
गर्भ तुला बघ राजस राहील होईल पुत्राहि गुंडा ।
" राष्ट्रोद्धारक " " तारक " ऐसा लाविल लोकीं झेंडा ॥ ४ ॥

पुढाऱ्यांतला तोच पुढारी ज्ञात्या माजी ज्ञाता ।
विश्वेशाचा ठसा पूर्णतो सत्ता त्याच्या हाता ।
जलास्थला वरि सत्ता त्याची, सार्वभौम तो होई ।
राज्या त्याच्या अंत न केव्हां, तळपत सूर्य सदाही ॥ ५ ॥

असंभवाया संभव कैसा ? वदे बालिका त्याला ।
बलवंत न मज दिसे कुठे, घे शक्ति नाथ जन्माला ।
देवदूत तो सांगे बाळे, तुझिया पोटीं बाळ ।
' सर्व शक्तिवान् ' येईल जन्मा, कलिकालाचा काळ ॥ ६ ॥

—२—

देवदूता ! त्या राष्ट्रांच्या सम्राटाचें—त्या शहानशहाचेंच विमल व मधुर स्तोत्र माझा आत्मा गात आहे; भविष्य कालाचा देशोद्धारक, माझ्या जीवनरूपी कमलाला प्रफुल्लित करणारा भगवान् सूर्यनारायणच भासत आहे; व तेणेंकरून मला धन्यत्व लाभल्यास नवल तें काय ?

*　　*　　*　　*

त्या परमात्म्याची लीला अगाध असून त्याची मजविषयींची घटना अघटित अशीच आहे; त्याचें पवित्र नांव या जडजीवास तारक आहे.

*　　*　　*　　*

जगाच्या प्रारंभापासून तों प्रलयापर्यंत त्याची जड जंगमावर समदृष्टी आहे ! तो आपल्या भक्तांस कधीं कांहींहि कमी पडूं देत नाहीं.

*　　*　　*　　*

त्याच्या नुसत्या नजरेनेंच प्रबल हतवीर्य बनतात; अभेद्य दूर्ग जमिनदोस्त होतात, आणि दुराभिमानि पुराणीं राष्ट्रें केव्हांच लयास जातात. !

*　　*　　*

शक्तिवंत व 'मी मी' म्हणविणाऱ्या राष्ट्रांना त्यांच्या सिंहासनावरून खालीं खेचून त्याच सिंहासनावर दुर्बल व नम्र अशांना त्यानें बसविलें आहे ! निर्धन पण प्रगमनशील अशा राष्ट्रांस त्यानें उत्तमोत्तम साधनें अनुकूल करून ठेविलीं आहेत; सधन राष्ट्रांची त्यानें रितहस्तानचें बोळवण केली आहे !

*　　*　　*　　*

त्या परमात्म्याच्या वचनावर ज्याचा नित्य विश्वास आहे, त्याच्या कृपालहरींचें जो मुदित अंतःकरणानें स्मरण करितो, व त्याच्या स्वतंत्र व रमणीय अशा सगुण सेवेंत जो अहर्निश निमग्न, अशा देशांसच तो परमात्मा आपला म्हणून त्यास पदोपदीं सहाय्य करीत असतो.

# एशियाचा-प्रभातकालः

## एशियाचें ऐक्य.

जातिविशिष्ट कल्पनांचा त्याग करून आपण माझा जो गौरव केलांत, त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. मी आणि इतर कित्येक विदेशी मित्र आजच्या संमेलनांस हजर आहोंत. प्रस्तुत संमेलनांतील आमचें हें अस्थित्वच ही गोष्ट स्पष्ट रीतीनें सुचवित आहे कीं, येथें राष्ट्रीय हितकल्पनेपलिकडील अशा काहीं तरी अधिक उच्च भावनांचा प्रादुर्भाव झालेला आहे. राष्ट्रीय आणि वर्ण व जाति-विषयक क्षुद्र कल्पनांना तिलांजली देणारी-मानवी ऐक्याचा मूलभूत हेतू-मानव्याची उदात्त व नूतन भावना या संमेलनांत विलसत आहे. मानव दिग्भागीं प्रकाशमान होणारा हा अरुणोदयच होय. उदय म्हटला कीं तो पूर्वक्षितिजावरच व्हावयाचा; तद्वत् हा उदय देखील तेथेंच होत आहे. मी एशियास जाहिर करून सांगतों कीं हा अरुणोदयच होय. माझ्या स्वत्वाचा एशियाच्या महान आत्म्यांत विलय झाला आहे.

जेव्हां ' अखिल जाति व वर्ण यांची समता व बंधुभाव ' या शब्दसमुच्चयाचा तुम्हीं उच्चार करितां, तेव्हां ते शब्द व त्या कल्पना मूलतः व मुख्यतः-फ्रान्सच्याच असल्यामुळें, त्यांचें मला विस्मरण कसें व्हावें ? युरोपीय प्रजेमध्यें माझाच देश पहिला व अद्याप एकटा नाहीं काय, कीं ज्यानें रंगीत कातडीचें कवच भेदून काळ्या गोऱ्यांचा भेदभाव न धरतां आपल्या पार्लमेंटमध्यें कित्येक काळ्या प्रतिनिधिंचाहि सत्कार केला आहे. प्रस्तुत संमेलनांत देखील मी हेंच आश्वासन देतों कीं, गतकालाप्रमाणेंच वर्तमानकालीं सुद्धां फ्रान्स मानवी कल्पनेचें द्योतक म्हणूनच नांदत आहे!

इतकें असून देखील पॅरिस येथें भरणारी तह–परिषद व राष्ट्र–संघ,– यांतूनच तुमच्या सर्व इच्छा सफल होतील, आणि वर्णविषयक कल्पनांचा अंतिम उच्छेद त्यापासूनच होईल असें म्हणणें देखील चुकीचेंच होय; कारण ज्यांना उद्देशून तुम्हीं हा उल्लेख करीत आहां, ते कितीहि धनसंपन्न व सर्व-शक्तिमान असले, तरी तुमच्या मागण्यांची पूर्तता करणें त्यांच्या शक्ति बाहेरचें होय. तुम्हांस असें वाटतें काय कीं, ते मनुष्याचें अज्ञान व त्यांचा अहंकार यांचा अचूक निर्णय करून, त्यांचें ते शमन करूं शकतील ? विशिष्ट तऱ्हेचा एक अन्योन्य संताप मानवी मनाला जडलेला असून, त्यांतूनच जाति, वर्ण, दर्जा, व लिंग या सर्वांचा उगम असतो. तुम्हांस असें वाटतें काय कीं ज्यापासून पाशवी अन्यायाचें जनन होतें, त्या मानवी अज्ञानाचा ते एका शब्दानेंच केवळ नाश करूं शकतील ? तसेंच तुम्हांस अशा कल्पना तरी शक्य वाटतात काय कीं, तुमच्या ध्येयभावनेमध्यें त्यांचें हित अंतर्भूत होत असल्याशिवाय ते तुमच्या ध्येयाची कालत्रयींहि पर्वा करितील ? कारण त्यांच्या ध्येयमंदिरांत स्वहित-लालसेचीं पिशाच्चेंच थैमान घालित आहेत. ध्येयाच्या नांवाखालीं स्वार्थी अहंमन्यता छपविण्याची ही लबाडी आहे. तुम्हीं जर असल्या बालीश आशातंतूंचें जतन केलें असेल, तर त्यांस प्रथम झुगारून द्या. कारण तुम्हीं स्वतंत्र रीतीनें त्याहिपेक्षां अधिक सुंदर कल्पना ग्रहण करूं शकाल !

तुम्हीं त्या जुनाट युरोपाकडून कसली अपेक्षा करणार ? मूलतःच जें त्याजपाशीं नाहीं, उलट जें तुम्हींच त्यांस दिलें पाहिजे–अर्थात ही देणगी म्हणजे नूतन चैतन्य होय–त्याबद्दल तुम्ही त्यांजपुढें हात पसरावयाचा नाहीं. वर्ण विशिष्ट रक्तदोषाचा त्यांस परित्याग करण्यास सांगणें हें तुमचें कामच नव्हे; उलटपक्षीं त्या घाणींतून तुम्ही त्यांचा उद्धारच करावयास पाहिजे. त्यांच्या प्रायश्चित्ता–पुनर्जन्मा–पलिकडे त्यांजपासून तुम्हीं तिळप्राय गोष्टींची सुद्धां अपेक्षा करूं नये.

युरोपास आतां दुसऱ्यानें वांचविण्याचा प्रसंग येऊन ठेपला आहे हें तुम्हांस कळत नाहीं काय ? तिरस्कार व धुमश्चक्री यापासून त्याचें प्रेमोत्पादनानेंच संरक्षण केलें पाहिजे. अज्ञानाच्या कालकूट अंधःकारांतून त्यास सुमंगल आत्मप्रकाशांत आणून सोडिलें पाहिजे. मरणाच्या जबड्यांतून त्यास मागें ओढलें पाहिजे. युरोप आतां नाशाधीन—मरणाधीन झालेला आहे. त्याच्या त्या चैतन्यहीन कलेवरास त्याच्याच अपराधाची मूठ माती दिली गेली आहे. युरोपनें ज्या स्वरूपांत असावयास पाहिजे, तें स्वरूप त्यास अद्याप प्राप्त झालेलें नाहीं. ही क्रिया एशियावरच अवलंबून आहे. आजपावेतों त्या प्रेममय परमशक्तिचा दिव्योदय एशियांतच झालेला नाहीं काय ? आजपावेतों मानव जातींचे त्राते येथेंच निर्माण झाले नाहींत काय ? आणि म्हणून मी युरोपचा पुत्र येथें येऊन सांगत आहे कीं, एशियाला जागृत करा ! तुमचें कार्य द्विगुणित असल्यामुळें त्यास दोन्ही दृष्ट्या जागृत करा. हें कार्य भौतिक आणि आधिभौतिक अशा स्वरूपाचें आहे. ऐक्यवृद्धि व संघटना करून एशियास जागृत करा ! मानव जातीचे गुरु म्हणून नव्हे, तर मित्र म्हणून तसें करण्यांस तयार व्हा. जाति वा वर्णभेद—प्रधान कल्पना उद्दिपित होऊं देऊं नका. त्यांस गुलाम म्हणून नव्हे, तर बांधव म्हणून वागवा. जे गुलाम आहेत, त्यांस स्वतंत्र करून बांधवपदारूढ करा. त्यांना स्वकौटुंबिक बनवा. एशियाचा राष्ट्र-संघ—संयुक्तिक—संस्थान—संघ प्रस्थापित करा. हें तर तुम्हीं सहज सुलभतेनें करूं शकाल. याहिपेक्षां अधिक कार्य करा. कारण जेव्हां आत्मा एकाकार होतो, तेव्हांच शरिरें देखील एकरूप होतात. तुमच्या तसेंच अखिल एशियाच्या अंतर्यामीं ऐक्याच्या भावना उद्भूत करून व जागरूक होऊन एशियाचा आत्मा एकरूप—एकलीन—करा. एकच आत्मा सर्वांभूतीं व्यापला असून, सर्व सजीवता ही एकमेवात्मनेनच होय ! एशियाचा पवित्र ठेवा हाच होय. आणि हा एकच ठेवा असा आहे कीं जो युरोप लुबाडूं शकणार नाहीं. हा शोध निखालस एशियाचाच असून त्याच्याच परंपरागत मालकी हक्काचा होय. हेंच खरें सत्य. ह्या शोधानें—ह्या ठेव्या-

नेंच त्यास सर्व समर्थ बनविलें असून महत् पदाला पोंचविलें आहे. कारण युरोपीय जडवादी शास्त्र आपल्या शक्तिसर्वस्वानें नाशाचेंच जनन करणार; उलटपक्षीं आध्यात्मिक शास्त्र मात्र चिरंजीवित्व व चिरानंद यांचें जनन करितें. त्याचा नाश होणें कदापिहि शक्य नाहीं.

पाश्चिमात्य साम्राज्यांपैकीं छिन्नविछिन्न न होतां कोणतें राष्ट्र आजपर्यंत जिवंत राहिलें आहे ? तथापि भारतवर्ष, चीन, आणि जपान हींच सहस्त्रावधि शतकांपासून चिरंजीव असलेलीं तीन राष्ट्रें होत. आणि तींहि केवळ एका अटीवरच ! ती अट ही कीं, यशस्वित जीविताच्या गुप्त शक्तींचा अहोरात्र निदिध्यास करित रहाणें. ह्या महत्त्वाकांक्षेवरच तीं जिवंत राहिलीं आहेत. जीवितसर्वस्वाचें सत्यतत्व हेंच होय. ऐक्याच्या भावनेंत सर्वांचीं अंतःकरणें केंद्रीभूत करणें हेंच तें महान तत्व ! ह्या तत्वावरच सृष्टीची रचना उभारलेली असून, ती स्थिति आतां पुन्हां येणार.

पहा, ह्या प्रकारच्या सृष्ट्योत्पादनाची तयारी करण्यांत अखिल मानवसमाज कसे गुंग झाले आहेत ! तिचें स्वरूप उपरोक्त तत्वांकित असावें असा त्यांपैकीं प्रत्येकाचा प्रयत्न आहे. आजचे कित्येक विजेते जगाची रचना असमान शक्तिबलावर करूं पहात आहेत. कारण पशूबल हीच त्यांची वडिलोपार्जित जिंदगी असून तत्प्राप्त्यर्थच त्यांचा हव्यास असतो. तथापि तिचेहि ते मालिक नसून केवळ गुलामच होत. आणि म्हणून जेव्हां जेव्हां ते शांततेचा पुरस्कार करण्याकरितां म्हणून एकत्र जमतात, तेव्हां तेव्हां तेथें रणदेवता देखील अधिष्ठित झालेल्या असतात. कारण शांततेच्या उदात्त नांवाखालीं त्यांची इच्छा दुसऱ्यावर अधिकार गाजविण्याच्या सैतानी शक्तीचा डोलारा उभारावयाची असते. आणि खरोखरच पहा, त्यांच्या त्या सर्वाधिकारत्वाच्या गुप्त कृत्यास बाहेरून कसें उत्तर मिळतें तें ! मोठमोठ्या बलाढ्य व श्रीमान् राष्ट्रांशीं ते छोटेखानी राष्ट्रांची झुंज लावून देतात. नवीन नवीन छोटीं राष्ट्रें निर्माणहि करतात. आणि अत्याचारानेंच समतेचें स्वर्गीय सुराज्य प्राप्त करावें असाहि

त्यांचा ‘ अव्यापारेषु व्यापार ’ असतो. अशांचें अनुकरण करण्याची तुम्हीं पर्वा कां बाळगावी ? नव्हे तुह्मींच सर्वांना धडा घालून दिला पाहिजे. आपल्या अंतर्यामी समत्व व विश्वबंधुत्व यांचें बीज उत्पन्न करून, सर्वांना परस्पर प्रेम, आत्मैक्य, वर्ण व जाति या सर्वांच्या अन्योन्य स्नेहभावाच्या गोष्टी शिकवा. या व अशाच उच्च भावना—तत्त्वांवर एशियाच्या भावि सुधारणेचा विजयध्वज उभारा. सदसद्विवेकजन्य समता, सुरम्यन्याय, ईशसंमत, लोकशासन, प्रजाशासनपद्धति वगैरे खरें दैवीशासन उत्पन्न करा. जेथें पृथ्वी व आकाश यांचें मधुमिलन होतें, असा उज्वल समतावादी दिग्भाग उत्पन्न करा ! ऐक्याचीं साम्राज्यें निर्माण करा. अशा रीतीनेंच तुह्मीं विशिष्ट भेदभावांचा नाश करण्यास समर्थ व्हाल.

---

# एशियाचें भविष्य.

एक महिन्यापूर्वी आपणांस सांगितलेल्या गोष्टीचें मला स्मरण आहे. मी आपणापुढें असें बोललों होतों कीं, “ तुम्हीं ज्यांस उद्देशून बोलत आहां, त्यांजपासून प्राप्तीची यत्किंचितहि अपेक्षा करूं नका. ” त्यानंतर पुन्हां, एकदां आपणापुढें येऊन मी चार शब्द बोलावे, अशी इच्छा आपण दिग्दर्शित केल्यामुळें मी आज आपणांपुढें असें सांगण्यास उभा आहे, कीं “ आपल्या स्वतःपासून आणि भविष्यकालापासून सर्व कांहीं प्राप्त करून घेण्याची मनीषा बाळगा. ”

आपल्या लक्षांत अद्याप हें आलें नाहीं काय कीं, ह्या भूतलावरील सर्व सजीव—निर्जीव प्राणिमात्र आतां नूतन अवताराच्या मंगल तयारीस लागले आहेत. आणि असें असून देखील जे या नूतन मन्वंतरास अनुरूप अशी दिनचर्या आंखण्यास नाखूष आहेत, अशांचा धिःक्कारच केला पाहिजे; कारण ते स्वतःविनाशकच होत. जे न्यायी नाहींत, आणि सरळहि

नाहींत, अशांस देखील धिःकार असो; कारण ते लोक स्वतः तिरस्करणीयच ठरलेले आहेत. भूतकालाचा नाश होत आहे—नव्हे झालाच आहे. भूत कालाची आतां नुसती छायाच उरली असून उद्यांतर स्मृतिशेषाशिवाय दुसरें कोणतेंहि चिन्ह दिसणार नाहीं, हें आपल्या लक्षांत आलें नाहीं काय? अशा त्या भूतकालाकडूनच न्याय मिळविण्याची तुम्हीं अपेक्षा करीत आहां! त्यापाशींच भविष्याची मागणी—समता बंधुभाव, जाति व वर्णैक्य ही तुम्हीं केलीं आहे काय? जर तसें असेल तर त्या दिवंगत भूतकालापाशीं तोंड वेंगाडण्यांत तुम्हीं मोठीच चूक केलीत. त्याचप्रमाणें त्या भूतकालाचे जे प्रतिनिधिरूप आहेत, अशांकडे अपेक्षा दृष्टीनें पहाण्यांत देखील तुम्हीं चूकच केली आहे. कसलें कां ध्येय असो; जर त्यांचा स्वार्थ त्यांत संकलित झाला नसेल, तर ते त्याकडे लक्षच देणार नाहींत. जेव्हां ते सत्ताधीश होणें शक्य नसतें, तेव्हांच सत्याधीन होतात. जेव्हां त्यांस अन्य गत्यंतरच उरत नाहीं तेव्हां मात्र ते न्यायीपणाचें वेड पांघरतात.

तेव्हां त्या भूतकालास आपल्या अंधःकारपूर्ण अशा विवराकडे जाऊं द्या, आणि भविष्याकडे वळा! परंतु असें करतांना स्वतः-विषयीं मात्र काळजी घेत जा. भविष्यकाल म्हणजे भूतकालाची सुधारलेली आवृत्तिच होय. तुम्हांपेक्षां जे अशक्त आहेत, त्यांच्या वाटेस मुळींच जाऊं नका. भविष्यकालाला ज्याची दुरुस्ती करावी लागेल, असें त्याजकरितां कांहीं एक करूं नका. जेव्हां एखाद्या अन्यायाचें प्रवर्तन होतें, तेव्हां जर खरोखरच कोणाविषयीं दया वा अनुकंपा व्यक्त करणें योग्य असेल, तर ती तो अन्याय भोगणाऱ्याबद्दल नसून, त्या अन्यायाच्या उत्पादकाबद्दलच होय. कारण भविष्याचा संबंध तोडण्यास तो स्वतःच कारणीभूत होत असतो; इतकेंच नव्हे तर तो भविष्यकाल त्याचा शत्रू बनतो. अशा रीतीनें आपल्या कृतकर्माचें फळ तो स्वतःच तयार करीत असतो. अर्थात् तुम्हांवर कोसळणाऱ्या सांप्र-

तच्या अन्यायाविषयीं जर कोणाची कींव करणें जरूर असेल, तर ती तुमची नव्हे. ज्यांच्यासमोर अरुणोदय होत असतो, त्या पौर्वात्यांची नव्हे; तर जे आपल्या माध्यान्हिच्या कीर्तिसूर्याचा अस्त पहात स्वस्थ पडले आहेत त्या पाश्चिमात्यांचीच कींव केली पाहिजे. होय! जर कोणांस लज्जा वाटावयास पाहिजे असेल तर ती इतर वर्णीयांस नसून ज्यांची काया अद्याप गौर आहे, तथापि अनेक भयंकर प्रसंगांमुळें अर्ध-वट पालटलेली असून नरकवासाच्या प्रायश्चित्तानें अर्धशुद्ध झाली आहे, अशा लोकांसच तसें वाटावयास पाहिजे.

ही जात स्वतःस ख्रिश्चन म्हणविणारी असून ती एशियापुत्राचीच पूजक होय. तथापि त्याच एशिया पुत्रास—येशू ख्रिस्तास—ह्या भूलोकीं पुन्हां अवतार घ्यावासा वाटला, तर त्या बिचाऱ्यास अमेरिकेंत मज्जाव होणार; कारण त्या धनहीन विभूतिपाशीं गृहस्थपदारूढ होण्यास ठरा-विक द्रव्यनिधी नाहीं. ऑस्ट्रेलियांत त्याचा शिरकाव होणार नाहीं, कारण तो कामगार पुत्र असून एशियोत्पन्न होय; शिवाय त्यास परदेशीय वाङ्मयांत उत्तीर्ण होतां येणार नाहीं. दक्षिण आफ्रिकेंत जावेसें वाटल्यास त्यास तेथूनहि घालवून देण्यांत येईल. तेथें वर्णभेदमदानें धुंद झालेल्या ख्रिश्चन युरोपियनांशेजारीं त्यास ट्रामगाडींत देखील बसतां येणार नाहीं. प्रत्यक्ष ख्रिस्तासच अशा तुच्छतेनें आजचे हे ख्रिश्चन वागविणार! आणि ह्याच तऱ्हेस ते सुधारणा म्हणतात! रानटी सुधारणा!!

हें पशुतुल्य रानटी आचरण, या नानाविध जाति, हे वर्णभेद, हीं सर्व अन्योन्य सन्मानाभावीं व परस्पर समजुतीच्या अभावीं अहंकारमय अज्ञानी मूर्खपणांतच अंतर्भूत होत असतात. अहंकारासारखा दुसरा मूर्खपणा कोणताहि नाहीं, तसेंच अज्ञानासारखा अहंकारहि अन्यत्र नाहीं. तुमची पूर्व, जेव्हां तिनें पश्चिमेचा तुच्छतेनें अव्हेर केला तेव्हां पाशवीच होती. आज आमची पश्चिम तशी आहे; कारण तिनें पूर्वेचा तिरस्कार केला आहे. आणि म्हणून जों पावेतों युरोपनें आपल्या मातेसमोर—एशिया—

समोर आपलें मस्तक लीन केलें नाहीं, तों पावेतों त्यास सुधारलेला म्हणतांच येणार नाहीं. तथापि आपणांस पुन्हां फ्रान्सची आठवण देतों. ज्या देशानें मानव जातीच्या हक्कांची सनद पुकारली, आणि मला आशा वाटते, एक दिवस असा उजाडेल कीं, जेव्हां तो देश मानवजातीचा ‘ समान हक्काचा ध्वज ’ आपल्या ध्येय शिखरीं फडकावील. वर्णभेद मनांत बाळगून मानवजातिची नास्तिकत्वानें निंदा करण्याच्या दोषापेक्षां हें पुष्कळच बरें. अर्थात् जर फ्रान्स आत्मवंचना करीत नसेल तर त्याच्या आत्मिक उच्च भावनेंत, आणि प्रकर्षित बुद्धींत कोणाविषयींचाहि तिरस्कार समाविष्ट होत नाहीं असें खात्रीनें म्हणतां येईल. हे लोक एशियाकडून प्रत्येक बाबतींत मुक्तद्वाराची अपेक्षा करितात, परंतु स्वतःचे दरवाजे मात्र दुसऱ्यासाठीं उघडे ठेवण्यास केव्हांहि तयार नसतात; अशावेळीं लक्षांत ठेवा कीं त्यांच्या जवळच असलेल्या ओशियानिया बेटांतील फ्रेंच बंदरें व शहरें, जाति वा वर्ण विशिष्ट भेदभावांची पर्वा न करितां तुम्हांसाठीं सदैव मोकळीं आहेत. जा, सोसायटी बेटांत जा, टाहेटी, पापिएट, मार्क्वेसाझ, न्युकॅलेडोनिया, नाउमिया, अथवा फ्रान्सच्या ताब्यांतील कोणत्याहि बंदरांत खुशाल उतरा. फ्रान्सच्या नांवानें परममित्र म्हणून तीं सर्व आपल्या आगमनास्तव आतूर आहेत असेंच आपल्या प्रत्ययास येईल.

तथापि हेंहि मला कबूल केलें पाहिजे कीं, हा कांहीं विधायक उपाय नसून तें निराशेंतील समाधान होय. आणि आपण केवळ त्या निराशात्मक समाधानाकरितांच येथें एकत्र जमलों नसून, ह्यापेक्षां अगदींच उलट असें कांहीं तरी करण्याच्या हेतूनें होय. मग तुम्हीं काय करणार अशी कोणी पृच्छा केली तर त्यास काय उत्तर द्याल ? मला माहित आहे, कीं आपणांपैकीं पुष्कळांस राष्ट्रसंघांतून आपलें अंग तात्काळ काढून घ्यावेसें वाटतें. जर आपण ह्या निर्णयापर्यंत येऊन पोचलें असाल, तर मात्र पॅरिस येथें ज्या लोकांनीं तुमच्या प्रतिनिधिंच्या उपसूचनेस फेंटाळून

लाविलें, त्यांचे पाय आपण चांगलेच मोडलेत असें म्हणावें लागेल. कारण खरोखरच ह्या मार्गानें जाण्याचें तुमच्यांत धैर्य आहे असें जर त्यांस पूर्वींच कळतें, तर त्यांनीं अगदीं निराळ्या तऱ्हेनेंच आपलीं मतें दिलीं असतीं.

परंतु सत्य आणि अत्यंत शांत असें माझें स्वतःचें मत द्यावयाचें झाल्यास मी तरी असेंच म्हणेन कीं, ह्या प्रश्नांत मुळीं तितकें महत्त्वच नाहीं. कारण तुमच्या मदतीनें काय किंवा तद्विरहित काय, ह्या राष्ट्रसंघाच्या मेंढरी कातडें पांघरलेल्या लांडग्याच्या टोळीच्या जीविताची मला फारशी शाश्वतीच मुळीं दिसत नाहीं. स्वेच्छेनें त्यांची तळी उचलून धरणारे असे फारच थोडे भक्त असतील. या प्रजा–सत्तावादी संघास सर्वाधिकारी–संघ होण्यास सरळ व उघडपणाची बरीच आवश्यकता आहे. आणि तसें करूनहि जर हा संघ कदाचित् जिवंत राहूं शकलाच तर, झारचें हेग येथील शांतता मंदिर ज्या स्वरूपाचें होतें, तसलें उच्चपद तो निःसंशय मिळवील खरा ! ज्यापासून मानवजातीचें प्रचंड होमसत्र उत्पन्न झालें, त्या जगड्व्याळ भेसूर युद्धाचें हें मंदिर म्हणजे द्योतकच नां ? चांगल्याच्या नाशाइतकें भयंकर वाईट दुसरें कांहींच नसतें. आणि जों पावेतों मानवी अंतःकरण बदललें नाहीं, तों पावेतों कसल्याहि सर्वोत्कृष्ट संस्था निर्माण झाल्या तरी त्या निव्वळ फसवेगिरीच्याच ठरल्या पाहिजेत.

इतकें असून सुद्धां राष्ट्र–संघापासून अलिप्त रहाणें हा कांहीं रामबाण उपाय नव्हे, तर तो केवळ निराशावाद होय. जर तें तुमचें व्यक्तिगत हित नसून खरोखर ध्येय म्हणून तुम्हीं त्याचा पुरस्कार करीत असाल तर तुम्हीं तें ध्येय साध्य केलें पाहिजे. सत्वप्रधान असा एक अखिल राष्ट्रसंघ प्रस्थापित करा. लहान थोर, काळे गोरे, तांबडे पिंवळे, फार काय ज्यांना नुसतें नांव आहे, भाषा आहे, इतर मानवि समाजांप्रमाणें इतिहास आहे, अशा सर्व प्रकारच्या लोकांचें संकलन त्यांत झालें पाहिजे. असा एक संघ स्थापन हा झाला पाहिजेच; आणि तो निःसंशय होणार. तेव्हां त्या तयारीस प्रथम लागा. मानव्याची महासभा, वसुधैव कुटुंबाचें

एकीकरण, भूतलावर वास्तव्य करणाऱ्या सर्ववर्णीय लोकांच्या एकात्मक भावनेची व्याप्ती त्या महासभेंत झालीच पाहिजे. म्हणजे शेवटीं त्यांच्यांत खरा न्याय व आनंद नांदेल. जर तुम्हांस खरोखरच सात्विक मोठेपणाची आकांक्षा असेल, तर ही महान् गोष्ट जरूर घडवून आणा. ही गोष्ट म्हणजे भविष्यकालाच्या विजयाची अक्षय पताकाच होय !

ही तयारी करावयास प्रथम एशियापासूनच प्रारंभ करा. हेंच तुमचें खरें कार्य होय. एशियांतील सर्व स्वतंत्र राष्ट्रांची एक परिषद भरवा. एशियांतर्गत सर्व राष्ट्रें सरसहा स्वातंत्र्योपभोगित होण्याचा समय आतां लवकरच येणार. जों पावेतों इतर लोक गुलामगिरीच्या रौरवांत खितपत पडलेले आहेत, तों पावेतों तत्वतः कोणीहि स्वतंत्र होऊं शकत नाहीं. तसेंच जों पावेतों सर्वांचा सरसहा सन्मान होत नाहीं, तों पावेतों प्रायः कोणीहि सन्माननीय होऊं शकत नाहीं. अर्थात् जर तुम्हीं स्वतःचा सन्मान करूं इच्छित असाल, तर इतरांच्या सन्मानाची प्रथम दाद द्या. ज्यांस तुम्हीं अंकित केलें आहे, त्यांस अशा रीतीनें मुक्त केल्यानेंच तुम्हीं स्वतः मुक्त व्हाल. कारण दुसऱ्यांस बंधपाशांत जखडणें म्हणजे स्वतः देखील पाशबन्द्ध होणेंच होय !

एशियाचें संरक्षण करून स्वतःचेंहि रक्षण करणें हाच एक शाश्वत उपाय होय. आणि एशियाचें जतन म्हणजेच अखिल जगाचें संरक्षण होय. कारण ह्या सृष्टीचा आत्मा तेथेंच वास्तव्य करीत आहे. होय, हाच एकसत्यात्मक उपाय संभवतो. एशियाचें नूतन सुधारणा-मंदिर उभारलें पाहिजे. कारण जगाचे आशातंतू तेथेंच केंद्रीभूत झाले आहेत. अशा रीतीनेंच केवळ आजचीं दुःखें व मानभंग यांचा त्या भावी विजयानंदांत लय होईल.

# जपानचें-कार्य.

धुरंधर सेनानी आणि एक बडे फ्रेंच गृहस्थ म्हणून ज्यांचें नांव जगावर महशूर आहे, ते मार्शल पेटाईन ता. २३ फेब्रुआरी १८९९ रोजीं निरनिराळ्या जपानी वृत्तपत्रांच्या पांच बातमीदारांस कर्नल कोबायाशी यांज समक्ष असें म्हणाले होते, कीं ज्या जडवादाची निरर्थकता जर्मनीनें सिद्ध केली, त्या जडवादाचा जपाननें आतां त्याग केला पाहिजे; आणि आपलें स्वतःचें ऐतिहासिक ध्येय उभारलें पाहिजे. तोच संदेश आपल्या निमंत्रणावरून आज मी येथें घेऊन आलों आहे. फ्रान्सचा हा निरोप म्हणजे त्याचा प्रति ध्वनीच होय. मार्शल पेटाईनच्या व माझ्या मुखाद्वारें फ्रान्स आज तुम्हांस असें सांगत आहे कीं कोणत्याहि सृष्टच्य गोष्टींची आसक्ति उत्पन्न झाली म्हणजे ती मनुष्यास रसातळीं पोचविणारच; म्हणून अहर्निश वर—उच्चास्थितीकडे—पहा; आणि जर्मनी देखील आपल्या कबरस्थानांतून तुम्हांस कंठारवानें हेंच बजावीत आहे, कीं द्रव्यासक्ति ही नाशोत्पादकच होय. तसेंच जडशक्तिविषयींचा अहंकारमद शेवटीं मरण मुखांतच नेऊन पोंचविणार. गेलीं चार वर्षें ज्या महान अजब नाटकाचे प्रेक्षक म्हणून तुम्हीं तटस्थ राहिलांत त्या प्रलय नाटकाचें पर्यवसान वीस जातींच्या लोकांचें त्या अग्निकटोहांत भस्म होण्यांतच झालें. सुधारणा सुधारणा म्हणून त्या भयंकर गर्तेत जगानें उडी घेतली, तथापि त्यापासून देखील जगाला एक धडा मिळालाच ! एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'ध्येय ध्येयामागें लागा'? तोच एक शाश्वत व्यवहार्य व सत्य मार्ग होय.

तर मग कल्पना सृष्टींतील काव्यमधूर असा एक चित्रपट रंगवूं या ! ह्या चित्रपटावरून जपानला स्वत्वाची साक्ष पटून, तें स्वाचरणानें जगालाहि तसलेंच उदाहरण घालून देईल. हा चित्रपट म्हणजे एशियांच्या नूतन सुधारणेचा चित्रपटच होय. एखाद्या व्यक्तिच्या तोंडून

एशियाच्या सुधारणेविषयींचे उद्गार ऐकतांच युरोपियन लोक नाकें मुरडूं लागतात. कारण ह्या भूतलावर सांप्रतच्या भौक्तिक सुधारणेपेक्षां—ज्या सुधारणेनें आजच्या मानवी प्राण्यास सैतान बनवून जगालाहि नरक-पुरीचें स्वरूप दिलें—त्या सुधारणेपेक्षां अधिक उच्च व उदात्त अशा सुधारणायुगाचें साम्राज्य प्रस्थापित होईल, ही कल्पना देखील त्या लोकांस सहन होत नाहीं. कांहीं असो, नूतन सुधारणेची अत्यंत आव-श्यकता मात्र आहे खास ! कारण प्रस्तुत सुधारणेस डोक्यावर घेऊन ते कितीहि नाचोत, तिचा उच्छेद केवळ विधि—लिखितच होय. तर मग सृष्टीच्या पुनर्रचनेकरितां जपान काय करूं शकणार ? आपल्या राष्ट्रांत राहून, तसेंच बाहेर पडून देखील एशियाकरितां व मानवाकरितां, जपान ह्यापुढें काय करणार ? प्रश्नांच्या या त्रयसूत्रीस जपाननें त्रयं—गुण—विशिष्ट कृतींनीच उत्तर दिलें पाहिजे. अर्थात् मानवी ध्येयाच्या पूर्ण स्वरू-पाची कल्पना त्यांत हुबेहुब वठली पाहिजे; त्याचप्रमाणें प्रत्येक ठिकाणीं दिसून येणारी दोन विभक्त तत्वें त्या लोकांत पूर्ण व एकरूप झालेलीं असावींत; कारण या दोन विभक्त शक्त्या परस्परांस पावन करीत अस-तात. शास्ते आणि शासित याच त्या दोन शक्ति होत. जेव्हां त्या परस्पर दैवी सामर्थ्य ओळखेनाशा होतात, तेव्हां त्यांचा परस्पर विरोध सुरू होतो. कारण जर राजकर्ती शक्ति ही ईश्वरी संज्ञा मानली, तर प्रजापक्ष देखील तच्छास्त्यांचें मूर्त स्वरूपच होय. शास्ते हे जर प्रजैक्याचे प्रति-निधी तर शासित हें त्यांचें व्यापक स्वरूप होय असेंच मानलें पाहिजे. लोक—शासन हें ईश्वरी शासनाचें केवळ दुसरें नाममात्रच असूं शकेल.

अशा श्रद्धेनें तें ईशशासन ओळखा ! श्रद्धा ही राजकर्त्यांच्या अंगीं अलौकिक सामर्थ्य उत्पन्न करूं शकते. लोकसत्ता व तिची अवतारित विभूति या दोहोंचा योग्य परामर्ष घ्या, म्हणजे एकच स्वरुपाच्या या दोन अंगामध्यें कोणत्याहि अपवित्र गोष्टीचा पडदा आड येऊन जगावर काळोख पाडूं शकणार नाहीं, किंवा सत्यमय आकाशाहि झाकूं शकणार नाहीं.

तुम्हीं द्रव्यासक्तिला फेंटाळून लाविल्यामुळेंच अधिक सतेज झालां-होतां; तथापि ती द्रव्यासक्ति पुनःश्च भिन्न स्वरूपांत भिन्ननामाभिधानानें–भांडवलशाही या संज्ञेनें–जगावर संचार करूं लागली आहे. अखिल युरोपची ओरड आपणांस ऐकूं येत नाहीं काय ? तो आर्तनाद असें ध्वनित करीत आहे, कीं 'भांडवलशाहीची इतिश्री भयंकर दुर्भिक्ष व दारुण नादारी यांतच होत असते.' रशिया आपणांस हेंच बजावित आहे 'यदा यदा भांडवलशाहीचें एकछत्री साम्राज्य प्रस्थापित होतें, तदा तदा बोल्शेव्हिझमचें जनन हें व्हावयाचेंच.'

जेव्हां तुम्हीं पार्थिव व स्वर्गीय अशा दोन पवित्र भांडारांचा आपणापाशीं संचय कराल, तेव्हां प्रथम चीनकडे वळा ! कारण आपल्या लक्षांत येईलच कीं त्या धनाचे हे दोन विभक्त झालेले भाग, म्हणजे एकाच महान् तत्वाचीं दोन अंगें होत. त्यांचें मिलन हें झालेंच पाहिजे. हें ऐक्य परस्पर तडजोडीच्या दृष्टीनें नव्हे, तर एकमेकांच्या समरूपतें-तच झालें पाहिजे. पृथ्विचें हें तत्व म्हणजे ध्येय ध्यास, आणि स्वर्गाचें तत्व म्हणजे तत्प्राप्तीची गरज, हेच ते त्या धनाचे प्रकार होत !

अशा रीतीनें आपलें बाह्य कार्य सुरूं होतें, आणि तेंहि प्रथम एशियां-तच ! हें कार्य आपणांस माहित आहे. उद्यां एशियांतील जनता मुक्त होणार ! कारण स्वातंत्र्यलक्ष्मीचें ह्या भूतलावर आतां अधिष्ठान झालेलें आहे. प्रश्न एवढाच कीं तुम्हीं एशियाचे स्वातंत्र्यदाते होऊन अग्रपूजेचा मान पटकाविणार, कीं ज्यांची सत्ता झुगारून देऊन त्यांनीं स्वातंत्र्य मिळवावयाचें, त्यापैकींच तुम्हींहि एक व्हावें हें तुम्हांस आवडणार ? एशियां-तील सर्व जातींचे लोक आतां लवकरच एक होणार, कारण ऐक्यदेवता अवतार धारण करीत आहे ! पहिल्याप्रमाणेंच आपणापुढें दुसराहि एक असाच प्रश्न आहे आणि तो हा कीं, त्यांचें हें भावी ऐक्य घडवून आण-ण्याचें श्रेय तुम्हीं संपादन करणार कीं, तुमची पर्वा न करतां कदाचित् तुमच्याहि विरुद्ध त्यांनीं एक होणें तुम्हांस आवडणार ?

दोन वर्षांपूर्वी येथील जनतेस उद्देशून मी असें बोललों होतों कीं, चीन हस्तगत करण्यांस टिंगटाओस त्याच्या पूर्वस्थानीं नेऊन पोंचवा; तथापि तत्संबंधीं तुम्हीं अद्याप कांहींच केलें नाहीं. अशामुळें 'इदंच नास्ति परंच न लभ्यते' अशी स्थिती होऊन तुम्हीं दोन्ही गोष्टींना मुकाल. आज देखील पुन: हेंच बजावून सांगतों; एशियांतील एका जातीला तरीं स्वतंत्र करण्यांत तुम्हीं पुढाकार घ्याच! कोरियाला प्रथम मुक्त करा म्हणजे एशियाच्या विश्वासास पात्र होऊन, त्याची नैतिक सत्ता तुम्हांस मिळवितां येईल. जर तुम्हांस भविष्यकालाचा विजय मिळविण्याची महत्त्वाकांक्षा असेल, तर तुम्हीं त्याकरितां किंमत देखील तशीच दिली पाहिजे. ज्या मानानें तुम्हांकडून विलंब होत जाईल, त्या मानानें किंमतीचें पारडेंहि अधिकाधिक जड होत जाणार—तुम्हीं आपलें महत् कर्तव्य बजाविण्यास तयार असाल, तर क्षुद्र भावना व त्यांचीं साधनें यांचाहि परित्याग तुम्हीं केला पाहिजे. महत्कार्यकर्तृत्वाचा समय आतां प्राप्त झाला आहे.

हें एक भौतिक कार्य होय! तथापि दुसरें याहि पेक्षां उच्च असून तें आधिभौत्तिक स्वरूपाचें आहे. तुम्ही एकदा स्वातंत्र्यदाते झालांत म्हणजे आध्यात्मिक साम्राज्यांतील विजयी योद्धे म्हणून गाजाल! कारण त्या दैवी साम्राज्यांत जो विजयी नाहीं तो जीतच होय. तुम्हीं जगाचे उपदेशक व्हाल. आणि उपदेशकानें प्रथम स्वआचरणानें कित्ता घालून देऊन नंतरच उपदेश करावयाचा असतो. इतर तसें करीत नाहींत. कित्येक परधर्मीय लोकांस प्रतिबंध करण्याचा तुम्हांस कित्येकांकडून उपदेश केला जातो; तसेंच तुमचे उपदेशक जर त्यांच्या देशांत गेले, तर तेथें धर्मक्रांति घडवून आणितील अशा भय कल्पनेनें ते तुमच्या उपदेशकांस मज्जाव करतात. म्हणून तुम्हांस उलट असेंहि शिकविण्यांत येतें कीं, तुम्ही देखील इतर धर्मीय उपदेशकास तुमच्या देशांत पाऊल ठेऊं देऊं नका; असल्या सल्लागारांस योग्य तें प्रत्युत्तर देण्याकरितां, मी तुम्हांस उलट असाच उपदेश करतों कीं प्रत्येक धर्मास पुरता वाव असूं द्या! तथापि तुम्ही देखील त्या सवलतींचा फायदा घेतला पाहिजे. तसेंच

तुमच्या देशांत येणाऱ्या प्रत्येक ख्रिश्चन उपदेशका गणिक तुम्हीं देखील आपला बुद्ध वा शिंटो भिक्षू त्यांच्या देशांत पाठवीत जा. जगावरील इतर अनेक व्यवहाराप्रमाणेंच धार्मिक व्यवहारांत देखील परिव्राजक प्रतिनिधींची अदलाबदल केली जावी.

त्यांना ओळखत नाहींत असे अजाण, त्यांचा उपहास करतात असे अज्ञानी, त्यांची ज्यांना गरज आहे अशांपैकीं कित्येक मदांध, अशा-प्रकारच्या सर्व लोकांस तुम्हीं आपला प्रेमानंदी सुरम्य धर्म शिकवा; जो धर्म रक्तपातापासून अलिप्त व शुद्ध आहे, त्यांसच ‘ जगावर शांतता नांदो ’ असें सांगण्याचा अधिकार आहे. ज्या एकेश्वर वाद्यांनीं आपल्या निर्गुण निराकार अशा एकलकोंड्या ईश्वराकरितां सारा स्वर्ग ओसाड पाडला, अशांस जाऊन सांगा कीं प्रकृति आणि पुरुष यांच्या पूर्वजरूप अशा अनेक देवतांनीं सारा स्वर्ग गजबजून गेला आहे. ते सर्व नानाविध स्वरूपी देव मूलतः एकरूपच होत. एकाच परमपुरुषाचीं तीं निरनिराळीं व्यक्त स्वरूपें व कल्पना होत. दयाघन परमेशाच्या नांवाखालीं ज्यांनीं द्वेष व भयाच्या पाशवी विकारांनींच अखिल सृष्टि भारून टाकिली, अशा धर्मीयांस जीव शिवाचें ऐक्य, व अखिल मानव—जाति व वर्णांचा पर-स्पर बंधुभाव, या गोष्टी शिकवा !

जो सर्वांभूतीं सर्वांठायीं, चराचर वस्तूंमध्यें व्यापला आहे, जो आपले संदेशकार जगावर पर्यटनार्थ पाठवीत असतो, जो स्वतः मानवरूपानें युगेयुगे अवतार धारण करित असतो, अशा त्या परमात्म्याच्या नांवानें उपरोक्त लोकांस—पाश्चिमात्यांस—कळवा कीं मनुष्य देखिल ईश्वररूप बनूं शकतो! जा, अवताराचा हाच सुमंगल समय होय. जा, सर्व राष्ट्रांना हेंच सूत्र कळवा! अल्प संख्यांक वामन मूर्तिंनो ह्या विस्तृत जगांत संचार करा, घाबरूं नका! बायबलांतील गोलियाथ व डेव्हिड यांच्या गोष्टींत सांगितल्याप्रमाणें सैतान कितीहि समर्थ असला, तरी डेव्हिड प्रमाणेंच अचल व निडर रहा, आणि त्या भावि विजयी सेनापतीचे दूत व्हा!!

---

# लोक-शासन.

तुम्हीं मला असा प्रश्न केला होता कीं, जगड्व्याळ युद्धाची परिसमाप्ति नुकतीच झाली असतांना आतां आम्हीं लोकशासन ध्येयाशीं एकरूप कसे होणार ? परंतु माझी अपेक्षा तुम्ही मला असा प्रश्न कराल अशी होती कीं, खोट्या लोकशाहीच्या मिथ्या कल्पनांचा नाश करून आम्हीं तिच्या सत्य कल्पनेशीं समरूप कसे होणार ? अथवा अधिक स्पष्ट बोलावयाचें तर असेंच म्हणावें लागेल कीं प्रचलित प्रजासत्तेच्या खोट्या कल्पनांचा अव्हेर करून लोकशासनाची खरी कल्पना आम्हीं केव्हां ग्रहण करूं शकणार! तत्वतः तुम्हां लोकांचा योग्य असा हाच प्रश्न होय.

लोकशासनाचे मूलतः दोन प्रकार आहेत. पैकीं पहिला म्हणजे सत्यात्मक ध्येय. हा प्रकार अद्याप कोणत्याहि मानवी समाजानें ओळखिलेला नाहीं. त्याचा शोध इतःपर व्हावयाचा आहे. दुसरा प्रकार मात्र आजच्या बहुतेक राष्ट्रांनीं निरनिराळ्या स्वरूपांत उचलला आहे. लोकशासनाच्या ह्या द्वितीय प्रकाराचा सर्व साधारण रित्या 'पार्लमेंटरी प्ल्युटोक्रॅटिक इंडिव्हिज्युऍलिझम' ( पार्लमेंट मध्यें असलेल्या व्यक्तिचें केवळ त्यांच्या श्रीमंतीमुळेंच वर्चस्व असणें ) अशी व्याख्या करितात. ह्या प्रकारच्या लोकशासनासच तुम्हीं कवटाळूं पहात आहां काय ? जर तसें असेल तर तत्संबंधीं पुन्हां एकदां खात्री करून घ्या. पाश्चिमात्यांचेंच तंतोतंत अनुकरण करावयाचें झाल्यास फारसे प्रयत्न करण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण त्या अनुकरण पटलाचा अर्धा अधिक बुरखा तुम्ही ह्यापूर्वींच घेतलेला आहे. कोणात्याहि कल्पनांचा अंशतः तरी अंगिकार केल्याशिवाय त्यांचें जूं कोणासच झालें तरी नीट उचलून धरतां येणार नाहीं. परकीय मालाची आयात हें निर्भयपणाचें लक्षण नव्हे, कारण परदेशी मालाबरोबर जकातिच्या पैशाचा व्यवहार आला, आणि वित्त लाभलें कीं चित्ताची विकारवशता ही आलीच.

वस्तूनंतर तिचें तेज ( उत्पत्तिनंतर आकार ) दृष्टोत्पत्तीस येत असतें आणि प्रत्येक वस्तूंत तिच्या उत्पादकाच्या मनःस्थितीचें प्रतिबिंब स्पष्टपणें उमटलेलें असतें. ह्या दृष्टीनें जपानची पार्लमेंटरी व प्ल्युटोक्रॅटिक मार्गानें चांगलीच प्रगती झालेली आहे असें म्हणावें लागतें.

अशामुळें दोन दुष्परिणाम उद्भवतात. पैकीं एक साधारण स्वरूपाचा असून दुसरा मात्र भयंकर प्रकारचा होय. पहिला असा कीं युरोप आपलें राजकीय व सामाजिक स्वरूप प्रत्यहि नखशिखांत बदलत असतांना, त्याचेंच तुम्हीं अनुकरण करीत आहां. अमेरिका देखील त्यांचें अनुकरण लवकरच निसंशय करणार ! परंतु पुढें असा प्रसंग येईल कीं, सांप्रतच्या सर्व संस्थांचा ते रानटी व अवनतिमूलक म्हणून अव्हेर करतील. आणि तुम्हीं तर त्याच संस्था आपल्या उत्कर्षाचें अंतिम ध्येय म्हणून मानल्या आहेत. अशा रीतीनें जपान अंधानुचर बनून, कालगतीच्या मागें राहूं पहात आहे.

अशा प्रकारचें एक ढळढळीत उदाहरण जपानच्या दृष्टीपुढें आहेच. दहा कोट लोकांत समतावादात्मक व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रवृत्तीला मागें सारून, मजूर–संघात्मक प्रवृत्ति त्या स्थानीं अधिष्ठित झाली आहे; आणि कित्येक कोटी लोकांत याच प्रवृत्तीचा प्रादुर्भाव होऊं पहात आहे. अशा रीतीनें अनेक प्रातिनिधिक संस्थांना मागें लोटून मजूर संघ पुढें येत आहे. युरोपचा अर्धा अधिक भाग त्यानें व्यापला असून, बाकीचा लवकरच त्या छत्राखालीं येणार.

हें सारें यक्षिणीच्या प्रतापानें घडून येत आहे असें मुळींच नव्हे. प्रस्तुत महान क्रांतीमय घडामोड जरी घडून येत असली तरी ती त्या नैसर्गिक स्थित्यंतराची सहज परिणामवत् होय. ह्या उत्क्रांतीचीं कारणें शोधून काढणें फारसें अवघड नाहीं. कारण तीं सर्वत्र अभिन्नच असून अखील पाश्चिमात्य सुधारणेंत तींच आज प्रामुख्यानें धुमाकूळ घालीत आहेत.

आतां दुसरा प्रकार पहा. तो तर तुम्हांस जास्तच भयप्रद होय. तुम्हीं ज्या मार्गाचें आक्रमण करीत आहां तो अत्यंत भयप्रद स्थितीस नेऊन

पोंचविणारा आहे. वस्तुस्थिती ही अशी असतांना तुम्हाला अद्याप असाच भ्रम वाटत आहे कीं आपण दुसऱ्याच्या मागोमाग तसल्याच भयप्रद मार्गानें जाऊन देखील तो दुष्परिणाम टाळूं शकूं. तथापि तो दुष्परिणाम जितक्या निःसंशयतेनें युरोप व अमेरिका यांस भोंवणार, तितक्याच खात्रीनें तो जपानलाहि गुरफटणार !

जेव्हां एखाद्या राष्ट्रांत जडशक्ति ही चैतन्यशक्तीवर आपली सत्ता गाजवूं लागते, तेव्हां भौतिक उत्कर्षाचा तो माध्यान्हकाळच समजावा. प्रथम पैसा, आणि नंतर मजूर हे अनुक्रमानें सत्ताभिषिक्त होत असतात. जेव्हां मजूरीचा उद्योग हाच राष्ट्राचें उत्कृष्ट जीवन म्हणून गणला जातो, तेव्हां औद्योगिक कामगार हा क्रमशः राष्ट्राचा प्रमुख घटक बनूं लागतो. पैसा सत्ताप्रधान झाला म्हणजे त्याचा उत्पादक जो मजूर, तोच राजा बनतो. मग अर्थात सर्व हितसंबंध मुख्यतः त्याजवरच अवलंबून असल्यामुळें सर्व कांहीं त्याच्या चरणाशींच विनम्र होणार. कामगार—मजूर हा अधिकृत भांडवलाचा केवळ आधारस्तंभ असून, त्यावाचून अन्य गत्यंतरच नसल्यामुळें, शेवटीं सर्वाधिकारांत त्याचा लय होतो. खरें सुराज्य आणि तदनुरूप लायकी यांचें गौप्य हें आहे कीं, शक्य तितकें जनसमाजाच्या अधिकाधिक सेवा योग्य होणें. ( सेवा धर्मोत्तमः ) सुधारणेच्या नांवाखालीं गर्जत असलेला प्रचलित पाशवी जडवाद आणि यांत्रिक उद्योगाची प्रगति, या दोहोंचा तर्कशास्त्रसंमत असा निष्कर्षित परिणाम म्हणजेच मजुरांची डोईजड सत्ता हा होय. जपाननें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं ज्या आर्थिक परिस्थितीनें भांडवलशाही उत्पन्न केली, तीच पुढें बोलशेव्हिझमचें उत्पादन करणार !

असल्या उघड प्रत्यक्ष परिणामाकडे डोळेझांक करून कांहीं एक फलनिष्पत्ति होत नाहीं. आणि हीच गोष्ट डोळे उघडण्यास पुरेशी आहे. कारण कालचक्राचीं चिन्हें अपरिमित व दृश्य आहेत असल्या अनेक उदाहरणांपैकींच पुराणमताभिमानी पक्षांतील लहान मुलांचीं मनें देखील

स्वाभाविक कल्पनांनीं उत्क्रांत झालेलीं आहेत हें एक होय. प्रत्यहि दिसून येणाऱ्या सहस्रावधि उदाहरणांपैकीं खालील एकच पहाः—

एका जपानी छोकऱ्यानें एका रशियन बाईविषयीं असे उद्गार काढले कीं, “ तिची विचार–सरणी भयंकर प्रकारची आहे. ” हें ऐकून त्याच्या शिक्षकानें त्यास प्रश्न केला, ‘ असें कां म्हणतोस, तिचे विचार बंडकारक आहेत म्हणून कीं काय ’ ? त्यावर मुलानें उत्तर दिलें, ‘ नाहीं ! तसें नव्हे, तर लेलीन व ट्रॉटस्की यांचे विचार मला पटतात, आणि ही बाई त्यांच्या विरुद्ध बोलत असते ’ हे उद्गार काढणारा छोकरा एका पेढीवाल्याचा मुलगा असून, भविष्यकालाची कल्पना त्याच्या वरील शब्दांत प्रतिबिंबित होत आहे. ही विचार-सरणी तुम्हांस कदाचित् आवडत नसेल, परंतु आतां तिजपासून तुम्हीं अलिप्त तरी कसे रहाणार ?

कवींच्या काव्य मधूर कल्पनातरंगाचा हा प्रश्न नव्हे. तो भाग्यशाली पुरातन काल ! जेव्हां ह्या भूतलावर औद्योगिक वा व्यापारी अस्तित्व असें नव्हतें, जेव्हां कामगार आपापलें कौशल्य व आत्मा या दोहोंची विक्री करण्यास तयार नव्हता, त्या आध्यात्मिक पुराणकालाकडेहि वळण्याचें कारण नाहीं. कारण तत्समयीं त्यास स्वचरितार्थमागें धांवावें लागत नसे. अन्नसामुग्रीचा तो ईश्वरी देणगी म्हणूनच स्वीकार करी; आणि दोन हातानें जें जें कांहीं उत्पन्न करतां येणें शक्य असेल, तें सर्व तो ईश्वरार्पण करीत असे. अशा रीतीनें हा परस्पर देवघेवीचा जणूं काय व्यवहारच चालत असे. तो काल आतां केवळ स्मृतिगम्यच होय. मानवी प्राणी आतां स्वतंत्र राहिलेला नाहीं. मनुष्य म्हणजे केवळ व्यापारी मजूर. त्यांचे श्रम त्या दैविक शक्तिकरितां नसून द्रव्योत्पादक धन्याकरितांच होत. आणि अशा परिस्थितींत देखील त्यानें निष्काम कर्मध्येयाची जोपासना करावी असेंच तुम्हांस वाटतें काय ? जर तसें असेल, तर तो ज्यांच्या कारखान्यांत काम करीत असतो, त्यांच्या भागिदाराचें मन प्रथम वळवा; आणि मग कदाचित् तुम्ही त्यास त्याच्या गुलामगिरीचा विसर पाडून,

स्वामित्वाच्या आशावादापासून त्यास परावृत्त करूं शकाल! तथापि पुनर्पद प्राप्ती जरी शक्य नसली तरी कित्येकांस असें वाटतें कीं, निदान ह्या पुढील पायरी तरी शक्तिबलानें अडवितां येणें शक्य आहे. हा उद्योग एखाद्या सपाट मैदानाकडे वहात जाणाऱ्या पाण्याच्या पूरलोट प्रवाहास थोपवून धरण्यासारखाच होय. असल्या प्रवाहास तुम्हीं खरोखरच थांबवाल; परंतु अशा रितीनें तो जास्त बेफाम व अनिवार्य होत असतो. त्याच्या प्रवाह-मार्गांत अडथळ्याचे डोंगर खुशाल रचा, त्यांच्या ठिकऱ्या उडविल्याशिवाय तो प्रवाह कदापि थांबणार नाहीं; अर्थात हा अव्यापारेषु व्यापार निरर्थकच जाणार. चैतन्यशक्तिस अडथळा करण्यास कोणीहि समर्थ नाहीं. तुम्हीं त्यास जमीनींत गाडा, अंकूर रूपानें तो बाहेर येणार. त्याचा कोंडमारा करा, स्फोट निःसंशय होणार. ध्येयाक्रमणापासून कोणासहि परावृत्त करणें केव्हांहि शक्य नाहीं. ह्या जगावरील कोणत्याहि शक्ति संपन्न नोकरशाहीला आपल्या कायदेशस्त्राच्या जोरावर, ज्या स्वातंत्र्यमय वातावरणांत त्या अमर शक्तिचा उगम व संचार आहे, अशा उच्च पदारूढ जनतेच्या अंतःकरणांत प्रवेश करणें कालत्रयींहि शक्य नाहीं.

जुलूम हा अशक्त लोकांचा मार्ग आहे. ज्या स्थलाचा तुम्हीं अव्हेर करूं इच्छिता तेथें जाणारा हा बिनचूक आणि जवळचा मार्ग होय. याच मार्गाचा झारशाहीनें अवलंब केला होता; तुम्हीं तिचें अनुकरण करूं नका. जेव्हां तुम्हीं अत्याचारबलानेंच लढाया करण्याचा उत्सुक प्रयत्न करितां, आणि त्यांतील चिच्छक्ति तुम्हांस मान्य नसल्यामुळें, आपले सैनिक एखाद्या आत्मविश्वासू प्रजेवर शस्त्र गाजविण्यास पाठवितां, तेव्हां लक्षांत ठेवा कीं तें सैन्य बाह्यतः जेतें, परंतु अंतर्यामी मात्र जीत अशा स्थितींत तुम्हांकडे परतल्याचें तुमच्या प्रत्ययास येईल.

तर मग ह्यांतून मुक्त होण्याचा एकहि मार्ग नाहीं काय? होय, अद्याप एक मार्ग शिल्लक आहे. तो येथूनच माघार घेण्यांत, किंवा यापुढें

सर्वांच्या मार्गें राहण्यांत नसून, वस्तुस्थिती जशी असावयास पाहिजे, तशी जुळवून आणण्याकरितां धैर्यानें व आवेशानें पुढें सरसावण्यांतच तो मार्ग आहे. तसेंच तो मार्ग पळ काढण्यांतहि नाहीं, किंवा शरसंधानांतहि नाहीं; तर तो फक्त सेवाधर्मांतच आहे. जर तुम्हांस खरोखरच असें वाटत असेल कीं, भावि ध्येय भयप्रद किंवा शत्रुतुल्य नसावें, तर प्रथम त्याशीं एकतान व्हा. भविष्यापासून आपला नाश होऊं नये अशी जर तुमची इच्छा असेल, तर त्या भविष्याची उभारणी करा. स्वैर संचारित निर्झरापासून नाशमूलक उपद्रव होऊं नये म्हणून त्याचे उपयुक्त कालवे काढा, म्हणजे तोच अखंड प्रवाह जमिनींना फलद्रूप करील.

नूतन शक्ति अंकित करण्यास तुम्हीं तिला वळण लाविलें पाहिजे. आणि तसें वळण लावतांनां तुम्हीं तीस सहाय्यहि केलें पाहिजे. तिला इतरांच्या जोडीचें स्थान द्या. कामगार लोकांच्या हितसंबंधाना योग्य ती शिस्त व वळण लावा, म्हणजे पुढें केव्हांहि ते तुम्हां विरुद्ध उठण्याची चळवळ करणार नाहींत. न्यायाला सर्वांगीण, समतोल, व पूर्ण बनवा, म्हणजे त्याच्या मागण्या तितक्या तीव्र होणार नाहींत.

तात्पर्य ध्येय पूजन करा; तुमच्या व इतरांच्या लोभलालसेला आळा घालण्याकरितां ध्येयाचें अहर्निश पूजन करा! आत्मघातकी मार्गापासून परावृत्त व्हा. नुसतें अनुकरण करूं नका, शोधक व्हा; नकली बनूं नका तर कित्ता घालून देणारे शिक्षक व्हा; दुसऱ्यांचे खोटे खर्डे गिरविण्यापेक्षां, तुम्हींच दुसऱ्यांस खऱ्या लोकशाहीचे धडे शिकवा; आणि ते धडे तयार करण्याकरितां उच्च–पदारूढ व्हा!!

खरी लोकशाही केवळ व्यवस्था वा पद्धतींत नसून, तिच्या खऱ्या उपयोगांत आहे. ती केव्हांहि नियमबद्ध संस्था, संघ, अथवा पार्लमेंट यांवर अवलंबून नसते. इतकेंच नव्हे तर साम्राज्यें हीं लोकशासित, आणि प्रजा–सत्ताक राज्यें हीं एकमुखीं असूं शकतात. एखाद्या प्रजासत्ताक राष्ट्राचा अध्यक्ष हा एखाद्या सम्राटापेक्षांहि स्वाधिपत्योपभोग-प्रिय असूं शकतो.

ग्रीस येथील लोकशाही रोमच्या एकमुखी राजसत्तेपेक्षां देखील अधिक जुलमीच होती.

इंग्लंडांत इतक्या प्रजासत्ताक संस्था असून देखील, तेथें क्रांती पूर्वींच्या रशियाप्रमाणेंच अल्प संख्याक भांडवल-वाल्याचीच सर्व मालमत्तेवर मालकी असते. इंग्लंडचें पार्लमेंट मोठें नमूनेदार आहे; तथापि जगावरील एकंदर संपत्तीच्या दृष्टीनें तेथेंच जास्त विपन्नावस्था दिसून येते. नुकतेच थोड्या दिवसांपूर्वी इंग्लंडचे मुख्य प्रधान लॉइड जॉर्ज असें म्हणाले होते कीं, युद्धांत गुंतलेल्या सर्व राष्ट्रांत आंग्ल देशच अधिक नालायक व अन्नाला मोताद आहे.

खरी लोकसत्ता सत्ताधाऱ्यांच्या प्रजासत्तात्मक वाचाळतेंत नाहीं. एका अमेरिकन श्रीमान गृहस्थास त्यानें नुकत्याच रशियांत केलेल्या प्रवासांत असा अनुभव आला कीं, टोलेजंग बादशाही प्रासाद-शिखरापासून अथवा झारच्या श्रीमंती बडेजावीच्या अग्निरथापासून, तेथील क्षुधित कामगार आणि शेतकरी यांस आपण हाच धडा शिकविला पाहिजे कीं, असल्या प्रकारची आबादी म्हणजे कांहीं खरी लोकसत्ता नव्हे. निवडणूकीच्या प्रदर्शनाची कवाईत म्हणजे देखील खरें लोकशासन नव्हे. प्रजासत्ताकत्व हें सांप्रत गुलामगिरींत खितपत पडलेल्या दुर्दैव्यांना फसविण्यांत नाहीं, किंवा स्वतःच्या स्वार्थाकरितां पांच सहाशें अधिकाऱ्यांपैकीं एखाद्याच्या विरुद्ध वा त्याच्या बाजूनें मत देण्यास तो स्वतंत्र आहे, असें भासविण्यांत देखील खरी प्रजासत्ता नाहीं. बहु-संख्यांक लोकांचा जुलूम म्हणजे स्वतंत्रता नव्हे; तसेंच नामशून्य एकमुखी राजसत्ता किंवा निवडणूकीची अरेरावी ही देखील खरी प्रजासत्ता म्हणतां येणार नाहीं. खऱ्या लोकशाहींत मनुष्याच्या पारतंत्र्याचीं सर्व बंधनें तुटलीं पाहिजेत. जें त्यास थोर, सर्वांगसुंदर, उच्च, व सुखी करूं शकेल तेंच खरें स्वातंत्र्य. 'आम्हीं ज्याची अपेक्षा करितों तें हेंच कीं, सृष्टि देवतेच्या तत्वानुरूप अशी लोकशाही संस्थापित झाली पाहिजे' असेंच इमर्सन म्हणत असे.

प्रजासत्ताक राज्यपद्धतींत लहान थोरास समान महत्व असलें पाहिजे. थोरांना आपण गरिबच आहोंत आणि गरिबांना आपण श्रीमान आहोंत असेंच वाटलें पाहिजे. जेथें बडे लोक लहानांना उदाहरण घालून देतील, थोर पूर्णतः निर्लोभ असतील, आणि सार्वभौमांना देखील परमावधिच्या विरक्ततेनें जगांत नांदतां येईल, तीच खरी प्रजासत्ताक राज्यपद्धति होय. तुमच्या मेइजी बादशहाची कारकीर्द पूर्ण प्रजासत्तावादी होती. लोकांचीं बंधनें तोडून प्रथम अज्ञानांधकाराचा नाश करून, त्या नरेंद्रानें उदार अंतःकरणानें सर्व प्रजेचा भार आपणावर लादून घेतला. तो म्हणत असेः-

**‘ तीव्र हिमें संत्रस्त जाहले, जन दिसाति निशाकालीं ।**
**क्षुधार्त जनरव ऐकुनि माझी, निद्रा दूर पळाली ॥ ’**

पुढें अन्यत्र त्यानें म्हटलें आहेः—

**‘ वरति गगन हें विशाल शोभे, कार्यमग्न हे जन सकल ।**
**पुरविन कैसे हेतु तयाचे, हाच मनांत विचार ॥ ’**

ही खरी प्रजा-सत्तात्मक राज्य पद्धति होय.

जेव्हां प्रजेचें राज्यशासन हें शाब्दिक नसून दैविसत्तेप्रमाणें प्रत्यक्ष कृतीमध्यें प्रतिबिंबित होतें, जेव्हां सत्ताधाऱ्यांना प्रजा म्हणजे ‘ एक पवित्र ठेव ’ म्हणून वाटते , जेव्हां त्या राष्ट्राचा पहिला कायदा ‘ प्रजासत्ताकत्व ’ हाच असूं शकेल—जो कायदा राज्याचा सर्व कारभार लोकछंदानुरोधानेंच चालला पाहिजे असें ध्वनित करितो—तर, त्या राज्यांत खरी प्रजासत्ता नांदत आहे असें म्हणतां येईल. बाजार बुणग्यांच्या स्वैर लहरींना कांहीं खरें लोकमत म्हणतां येणार नाहीं; तसेंच आपला स्वार्थ साधण्यासाठींच केवळ कांहीं लोकांनीं केलेली ओरड ही देखील खरें लोकमत म्हणून गृहित धरली जाणार नाहीं. लोकांच्या मनोदेवतेपासून निघालेला आर्तनाद हेंच खरें लोकमत होय. जे स्वत्वास विसरतात, स्वार्थापासून निखालस अलिप्त राहूं शकतात, अशांनाच तें ओळखितां येईल; आणि त्याचा पुरस्कार करतां येईल. कांहीं धंदेवाईक राजकारणी लोकांची स्वपक्षलोलूपता हेंहि खऱ्या लोक प्रतिनिधित्वाचें लक्षण नव्हे.

त्या संघटित आत्मशक्तिकरितां व्यक्तित्वाचा परस्पर आदर, आणि व्यक्तिच्या आत्म्याकरितां संघटित शक्ति; या दोहोंची अन्योन्य सहकारिता म्हणजेच खरी लोकसत्ता होय. एकट्या संघशक्तिंत, किंवा एकाकी व्यक्तित्वांत प्रजाशासन अंतर्भूत होत नसून तिचें अस्तित्व उपरोक्त गोष्टींच्या मधूर संमिश्रणांत आहे. हें प्रजाशासन राजसत्तावादांतहि नाहीं, आणि प्रजासत्तावादांतहि नाहीं. खोट्या राज-सत्तेचा—जी सत्ता जें अशाश्वत आहे, त्यांसच कवटाळीत असते, अथवा जी ईश संकेताविरुद्ध असते, त्या सत्तानिष्ठेचा जेथें मागमूसहि रहात नाहीं, तेंच खरें लोकशासन होय. त्याच्या शुद्ध सात्विक स्वरूपांत खोट्या थोरवीचा थिल्लर नटवेपणा दिसणार नाहीं. तें स्वरूप उत्कट सत्याच्या पवित्र तेजानें झळकत असतें. जे जनतेचे खरे सेवक नसून तीस गुलाम बनविणारे सैतान असतात, तेच अन्याय प्रवर्तक शास्ते असतात. अशांचा तें उत्क्रांत–प्रमत्त–तेज सर्वश: नाश करितें. जनतेची संतापपूर्ण आत्मशक्ति अशा शास्त्यांचा चुराडा उडविल्याशिवाय रहात नाहीं.

खऱ्या लोकशाहीचा असा हा स्वभाव धर्म होय. जेथें जेथें म्हणून तिची प्राणप्रतिष्ठा होते. तेथें न्याय आणि सत्य हींच सत्ताधारी होत असतात. असाधारण अशा विरुद्ध कल्पनेला देखील तीं मंजुनिनादित व सहचारिणी बनवूं शकते. ऐक्य व स्वातंत्र्य यांची मैत्री जुळवूं शकते. सृष्टय कल्पनांना स्वर्गीय ध्येयाध्यासाशीं एकरूप करून लोकांच्या शासित अधिकाराचे अधिकार–शासनांत पर्यवसान करूं शकतें. अर्थात् हीच खरी लोकशाही, स्वर्ग आणि पृथ्वीला समरस बनवूं शकते. परंतु अशा ह्या लोकशासनाचें अस्तित्व आज कोठें आहे ? असें लोकशासित राष्ट्र ह्या भूतलावरील कोणत्या देशांत नांदत आहे? अद्याप कोठेंहि नाहीं ! !आणि म्हणूनच सर्व लोकांवर आजच्या ह्या धुमश्चक्रिचा वर्षाव होत आहे. जग ह्याच संक्रमणांत पिंगा घालित असून लोकशासनाचा त्रिखंड शोध करीत आहे. आणि शेवटीं ह्या धुमाकुळापासूनच खऱ्या लोकसत्तेचा उदय होणार.

तुम्हांला इतरांप्रमाणें ह्या धुमाकुळांत शिरावें असें वाटत नाहीं ना ? मग त्यांस तिकडे कोण ओढून नेतें हें नीट पहा; त्यांची स्वार्थपिपासा, व त्यांची अन्यायी कृत्यें हींच त्यांस ओढून नेत आहेत. त्यांनीं या जडजगाचाच अभिलाष धरून, स्वात्म्याला झिडकारिलें आहे.

बा, जपान ! तूं त्यांचें अनुकरण करूं नकोस. तुझ्या अंतर्यामी वास करणाऱ्या आत्म्याचें व तुझ्या परमेशाचें चिंतन कर. तुझ्या कार्याचा व आत्म्याचा शोध लाव, तें कार्य परिपूर्ण कर. एशियाला मुक्त कर. तेथील जनतेला सुख समृद्ध कर; हेंच तुझें कार्य. आणि असें केल्यानेंच तूं स्वतः सुखोपभोगित होशील. नंतर तुला खऱ्या स्वातंत्र्यसुखाचा महिमा कळेल. दुसऱ्यासाठीं जें जें सत्कृत्य तूं करशील, तें तें तुला पावेल. शुद्ध—अंतरंग प्रकाशाचें प्रतिबिंब बाह्य वर्तनावर उमटत असतें. त्या प्रतिबिंबाच्या सुंदर प्रभेनें तूं विभूषित होशील, आणि त्या योगानेंच अंतर्गत संघटनाहि घडून येईल.

जपान ! तुला बाह्य जगांत जें केलेंच पाहिजे, तें कार्य तूं कर; म्हणजे कोपांधःकारांत सापडणार नाहींस.

---

# भावि—अवतार.

चराचर वस्तूंनी व्यापलेल्या ह्या दृश्यादृश्य सृष्टींत जेथें जेथें सनातन निवासस्थान आहे, तेथें कांहीं तरी शाश्वत अशा चैतन्याचें वास्तव्य हें असतेच. आणि जेथें म्हणून ध्येय वास्तव्य आहे, तेथें भविष्यत्कालाचा उदय निःसंशय होतोच. असलें हें प्रत्येक निवास मंदिर म्हणजे जणूं-काय स्वर्गीय शहरांतील या भूतलावर उभारलेलें एक एक महागृहच होय. म्हणून या मंदिरांत—या महागृहांत—त्याहि पेक्षां श्रेष्ठ असें जें भावी

शहर त्यांस मी वंदन करितों. या जनसमूहा पलीकडील भावी पिढीला माझा प्रणाम असो.

आणि ह्याच मंदिराचा जो केवळ प्रकाश, आत्मा, अथवा केंद्र असून भविष्यत्कालाची उभारणी करीत आहे, त्या महापुरुषाला देखील मी ह्याच मंदिरांत नमन करित आहे. महापुरुष म्हणजे काय हें तुम्हांस माहित आहे काय ? पारमार्थिक भविष्याचा जो उपदेशक, तोच तो महाभाग होय. ज्या पुरुषाच्या हृदयांत तें भविष्य आगाऊ अवतीर्ण होतें, ज्याचा आत्मा त्या उच्चतम भविष्याचा आस्वाद घेण्याकरितां,—नव्हे केवळ नामोच्चाराकरितां सांप्रतचे प्रतिबंध वा नियमन पाहून तळमळतो; ज्या उत्पादक शब्दानें या जगावरील युगांतरीच्या मानवी प्राण्यांचे दैविक चमत्कार व त्यांच्या उत्पत्तीचें रहस्य हीं सिद्ध होऊन, त्यांचा पुनरुद्धार होतो; पुरातन लोकांचा जणूं जीर्णोद्धार होऊन नूतन जनतेचें जनन होतें; तोच तो महाशब्द—भविष्य—हा होय. कारण जेथें जेथें म्हणून त्या महापुरुषाचें वास्तव्य आहे, तेथें तो अवतारित पुरुष शक्ति व बिजरूपानें निःसंदेह उत्पन्न होत असतो.

तो अवतारित पुरुष ! त्याजविषयीं आह्मां पामरानें काय बोलावें ? त्याजविषयीं आम्हां पामरानें नुसता उल्लेख तरी काय करावा ? कारण तो आम्हांपेक्षां फारच श्रेष्ठ होय. तसेंच त्याजविषयीं नास्तिक भाव तरी कसा धरावा ? सर्व युगें त्याजकरितां अभिलाषोत्सुक झालीं आहेत; सर्व लोक त्याची उत्कंठित अंतःकरणानें मार्गप्रतिक्षा करीत आहेत; सर्व देवपुरुषांनीं त्याचा अवतार भाकित केला आहे. आज शतकानुशतकें त्या अवताराची तयारी चालली आहे. नाहीं ! आजचा मानव हा सृष्टिदेवतेचा परमपुत्र नव्हेच; विध्वंसक सुधारणेनें नटलेल्या राष्ट्रांतील मानवसंहारक, जगड्व्याळ महा—युद्धाचा पुरस्कर्ता मनुष्य, हा ईश्वराचा खरा पुत्रच नव्हे; कदाचित् तो श्रेष्ठ प्रतीचा व्याघ्र असूं शकेल, नरश्रेष्ठ मात्र खास नव्हे ! आज अखिल सृष्टि जी कण्हत कुंथत आहे, ती कांहीं या मानवा-

करितां नव्हेच. ज्याच्या जननाच्या प्रसववेदना ती भोगित आहे, तो आजचा हा मानव नव्हेच!

त्या पुरुषाची उत्पत्ति अद्याप झाली नसून होणार आहे; त्यानें अद्याप अवतार धारण केला नसून लवकरच करणार आहे. जनता अंतःकरणांत यापेक्षां अधिक प्राणांतिक अशा कोणत्या वेदना होणार? या जगावरील सर्व राष्ट्रें आपल्या मुक्तिदात्यास मुक्तकंठानें पाचारित आहेत, आणि तोच आतां अवतार धारण करीत आहे! भूपृष्ठ थरारत आहे हें तुम्हांस दिसत नाहीं काय? कां तर तो परम पुरुष अवतारित होत आहे. त्याच्या सम्राट्पदाच्या स्पर्शानेंच कीं काय, ही सृष्टि आंदोलन पावत आहे. सर्व जुनाट, मोडकळीस आलेल्या पसाऱ्याचा नायनाट होऊन त्याची नवीन मांडणी होत आहे, हें तुम्हांस दिसत नाहीं काय? असें होण्याचें कारण म्हणजे, त्याच्या दर्शनाची पूर्व तयारीच होय. जें जें त्याच्या आगमनास प्रतिबंधक आहे, आणि ज्या ज्या वस्तूंवर त्याचा शिक्का–मोर्तब नाहीं, त्याचा नाश हा ठेवलेलाच! अशा रीतीनें त्या श्रेष्ठ विभूतीच्या अवताराची जेव्हां तयारी होते, तेव्हां सृष्टीवर प्रचंड झंझावात, थरारून सोडणारी वावटळ, आणि दिव्य तेज हीं उत्पन्न होत असतात. ह्यानंतरच तें मनोरम व सूक्ष्म असें चैतन्यतेज सगुण रूप धारण करण्याकरितां मानवी अंतःकरणांत प्रतिष्ठित होतें.

ह्याप्रमाणें पुनर्जीवनापूर्वीं संहार, जननापूर्वीं मरण, उदयापूर्वीं अस्त, तद्वत् जगाच्या पुनर्रचनेपूर्वीं क्रांति ही व्हावयाचीच! प्रत्येक मोठ्या, आणीबाणीच्या, नाजूक प्रसंगीं कांहीं तरी बलवत्तर व चमत्कृतिपूर्ण अशी शक्ति अवतरत असते. जें शाश्वत अनाद्यंत आहे, तें आश्चर्योत्पादक व भयंकरच नसतें काय? त्याच अवस्थेची पुनरावृत्ति आज देखील होत असून, सृष्टीवर माजलेली धुमश्चक्री व दुःखयातना त्या ईशावतारास व त्याच्या साम्राज्यछत्रास लवकर प्रस्थापित करण्यास कारणीभूत होत आहेत. तथापि ह्या जगावर असेहि जनसमाज व त्यांचीं राज्यें आहेत.

कीं ज्यांस ही स्थिती सौख्यप्रद वाटणार नाहीं. त्यांस ही स्थित्यावस्था समजणार देखील नाहीं. ते भविष्याचा अव्हेर करून भूतकालाचा आश्रय धरूं पहाणारे लोक होत. उषःकालाच्या मांगल्यपूर्ण प्रतिभेकडे डोळे झांक करून अधिकारसंन्यास घेतलेल्या अस्तंगत सूर्याकडे आश्रय भावानें धांव घेणारे ते लोक होत. भविष्यावर त्यांचा विश्वास नाहीं; कारण जी सृष्ट्यवस्था होऊं घातलेली आहे, ती त्यांस भयावह होय. केवळ दुराग्रह बुद्धीनेंच ते भूतकालाचा आश्रय करूं पहात आहेत. ईश्वराचा ते धावा करितात, तथापि तो धावा भक्ति-भावाचा नसून, दोन हात करण्याच्या दुष्ट बुद्धीचा होय. जगाच्या प्रलया-वस्थेवर देखिल, बाहुबलानें सत्ता गाजविण्याची ते हांव धरितात, विजेच्या प्रचंड थैमानावर शांतता लादूं पहांतात, अहर्निश पुढें जाणाऱ्या अमर-शक्तिंना स्थैर्याचें कुंपण घालूं पहातात; आणि संपूर्ण भरती येणाऱ्या समु-द्रास एक पाउलहि पुढें न टाकण्याचा हुकूम गाजवूं पहातात; परंतु तो वृद्धिंगत समुद्र त्यांस आपल्या अमूप पोटांत सहज दाबून टाकितो. त्यांस असा भ्रम असतो कीं, जणूं काय ही सृष्टि म्हणजे त्यांच्या अहं-मन्य भावना तृप्त करण्याचें विशाल क्षेत्रच ! तथापि हा सृष्टय पसारा परमात्म्याच्या मूर्तस्वरूपार्थच होय. हें जग अवताराकारितांच सृजित झालें आहे.

ती अवतारित विभूति आपल्या कल्पनेच्या विरहीतच असणार. कदाचित् आपल्या कल्पना चित्राच्या अगदीं उलट अशीहि ती असेल. ती अवतारित विभूति आज तुम्हीं ज्या प्रमाणांत गुलामगिरींत अडकलेले आहांत त्याच प्रमाणांत सर्वस्वतंत्र असणार. वासनाशक्तिचे ते गुलाम आहेत, कारण ते अशक्तच होत; द्रव्य लालसेचे गुलाम आहेत, ते गरिब दरिद्रीच होत; तथापि ती येऊं घातलेली विभूति निःशस्त्र असून देखील सर्व शक्तिमान् रहाणार; लुटली गेली तरी गर्भ श्रीमंतच रहाणार. तो महापुरुष कोणत्याहि वस्तचीं अभिलषा धरणार नाहीं; कारण सर्व

वस्तूंचा मालक तोच होय. दिखाऊ शक्तिची त्यास गरज नाहीं, कारण सर्व शक्तिमत्तेचें केंद्रस्थान तोच होय !

आजच्या मानवाची सारी भिस्त स्वसंशोधित शास्त्रांवरच आहे, कारण तो अज्ञान पूर्ण होय. भ्रांतिमय धरसोडीच्या विचार-बंधनांचा तो बंदा गुलाम होय; तोच तो भावि ईशावतार सर्व अज्ञानांपासून आलिप्त असणार; भ्रांति ही त्याची दासी म्हणूनच रहाणार; तो स्वतः सत्य पूर्णतेनें वागतो; बुद्धिमत्तेच्या नियंत्रणाचे धागे तो तटातट तोडून टाकणार. कारण मानवी बौद्धिकतेच्या वरच्या अशा आध्यात्मिक उज्वल तेजानें प्रकाशित होणाऱ्या ज्ञानपूर्ण वातावरणांत त्याचें वास्तव्य असतें. तुमचे ऋषीमुनि ज्यास 'मेईटाकू' म्हणतात, तोच तो परमपुरुष नव्हे काय ? सर्व सद्गुण संपन्न, पूर्णत्वास पोंचलेला, असा तो तेजस्वीच नव्हे काय ? तो मिथ्या बजबजपुरींत रहात नसून, निसर्गसिद्ध अशा शांत प्रशांत स्थळीं मुग्धानंदात निवास करीत असतो. सर्व ऐहिक नियमनांच्या अंकित असून, आजचा मानव स्वतःस सद्गुणसंपन्न समजतो. तथापि तो अवतारित पुरुष नीतिमान व स्वतंत्र असणार. बाह्य नियमनांपासून, रुढी वा बंघनांपासून, तो पूर्णस्वतंत्र होय. इतरांच्या अपेक्षेपेक्षांहि उत्तम अशा नियमांचे पालन करण्यांस तो स्वतंत्र होय. कारण इतरे जनांस ह्या जगांत जें चांगलें म्हणून वाटतें, तेंच त्याच्या दृष्टीला कदाचित् वाईटहि दिसेल. तसेंच जें जें म्हणून वाईट आहे तें तो सर्वांग सुंदर बनवूं शकतो. सांप्रतचा मानवी विवक्षीत अशा धर्मांचा अनुयायी असल्यामुळें, स्वतःस पूर्ण धार्मिक लेखतो; धर्म म्हणजे मार्ग—तथापि शिखरावर मार्गच नसतात. तो ईश्वरी अवतार कोणत्याहि धर्मपंथाचा नसणार. सर्व स्वर्गीय निवासस्थानांचा पूर्णानुभव घेतल्यामुळें, त्यास सर्व धर्मांच्या मूर्त स्वरूपाचा व आराधना—पूजनाचा अर्थ समजलेला आहे. वेदांतर्गत प्रकृति आणि पुरुष, यांच्या अद्वैताचें मर्म त्यांस उमगलेलें आहे. शिंटो धर्मकल्पनेनुरूप स्वर्गाच्या निसर्ग सुंदर भूमीवरील

ईश्वराची काव्यमय एकस्वरूपी नानारूपता त्यास कळलेली असणार; बुद्ध धर्मीय पूर्ण शांततामय आत्ममुक्ति व अहंकार–रहित विश्वप्रेम, इस्लामी धर्मतत्व–जें आत्मविश्वास व ईश्वरावर अढळ हवाला ठेवण्यास, व त्याच्या नांवानें सर्वस्व त्याग करण्यास शिकवितें तें; तसेंच टाओ धर्मसंमत उच्च अव्यक्तता, आणि ख्रिस्ती धर्मानुमतें उच्च योग्यतेच्या अवतारोत्पत्तीचा चमत्कार, हीं सर्व त्यास पूर्णतः कळलेलीं असणार.

सृष्टीवरील सर्व धर्मांत, तद्बाह्य, तदुपर देखील जो एक अनंत धर्म आहे, त्याच धर्मपंथाचा तो अनुयायी होय. प्रकाशाप्रकाशित अशा ह्या जगावर, तसेंच स्वर्गांतील नंदनवनांत तो मोकळेपणानें वागडत असतो. पृथ्वीच्या अतर्क्य खोलीरूप पाळण्यांत तो आनंदानें झुलत रहाणार. जननमरणावर देखील अधिकार गाजविणारी ती दैवी विभूति अमर होय. स्वर्ग व सृष्टीचा तो नागरिक, जितक्या निर्भयतेनें देवांत वावरतो, तितक्याच मोकळेपणानें तो मनुष्यांत देखील वावरेल. ह्या जगाचा तो सम्राट, महान् उपदेशक बनणार.

परंतु तुम्हीं त्याचाच तर्क वितर्क कां करित बसतां? त्याचेंच वर्णन कशाला? आजच्या मानवा, तूं जर त्या विभूतीस ओळखिलेंस, तर तूं स्वतः देखील तद्विभूतिरूप होऊं शकशील. तत्सम व्हा! तो कोठें तरी निःसंशय आहेच आहे. अदृश्य असून प्रत्यक्ष हजर आहे. त्याजपाशीं आपलें हृदय खुलें करा; तो तेजरूप असून, सर्वांचा रक्षणकर्ता होय. तें तेज सगुण साकार स्वरूपांत प्रविष्ट होण्याकरितां तद्योग्य कलेवराच्या शोधांत आहे. कारण होऊं घातलेल्या अवतारास एकाकी व्यक्ति पुरेशी नाहीं. परमात्म्याची विजयश्री आपल्या ठिकाणीं कोण एकवटूं शकणार? सर्व संपन्नता, सुबत्ता, व सर्व बांधवांची एकी, या तत्वांचा स्फोट होण्यास त्याची अत्यंतावश्यकता होय. त्या अवताराला तसेंच विशिष्ट कुटुंब व समुदाय पाहिजे. म्हणून तत्सम व्हा!

भविष्यत्कालाचा हा आत्मा, भावी अवताराचें हें उज्वल तेज, ह्या समुदाया भोंवतीं घिरट्या घालीत आहे. तुमचे कितलेले दरवाजे त्या तेजो गोलाकरितां खुलें करा. तें दिव्य तेज ह्या राष्ट्रांत संचार करीत आहे, त्याचें परम सुराज्य संस्थापित होऊं द्या ! !

---

# " ईश-पुत्र "

ह्या जगावरील कित्येक माणसें सर्व साधारण लोकांपेक्षां अगदींच भिन्न प्रकारचीं असतात. सकृद्दर्शनीं किंवा बहिरंगावरून त्यांची तात्काल ओळख पटत नाहीं हें खरें आहे. तथापि जगतीतलावरील दुःखापदा व स्वर्गांतील चिदानंद यांत जें अंतर, तेंच उपरिनिर्दिष्ट परम पुरुष व इतरेजन यांच्यांत असतें; कारण त्या लोकांत आत्मानंद अगदीं एकवटल्यामुळें त्यांची आत्मानंदी तल्लीनता झालेली असते. ते ईशपुत्र मर्त्यलोकांतच रहातात.

बहुधा पुष्कळ गोष्टी अशा असतात कीं ज्या अनेकांस समजतहि नाहींत. जें दिव्य स्थल शोधनार्थ इतरेजनांची सारखी धडपड चालू असते, त्या गुप्त व तेजस्वी स्थानींच त्याचा निवास असतो. त्या पुण्यस्थळाची इतरांना माहिती नसल्यामुळें, तत्शोधनार्थ चांचपडत असतानां अनेक स्थळीं चांगलेंच ठेंचाळावें लागतें. सामान्य जनतेस जें ज्ञान नाहीं, तें त्या दैवी विभूतीस सहाजावगत असतें. त्याचें आयुष्य परम सत्यमय होय. तसलें आयुष्याक्रमण केल्याशिवाय कोणी झालें तरी त्यांतील महदानंद कसा ओळखूं शकणार ? सामान्य जन जें मिळविण्याची उत्कंठेनें मार्गप्रतिक्षा करित असतात, तें त्याजपाशीं जन्मतःच असतें; परंतु तत्प्राप्तीची झाली तरी नुसती अभिलाषा धरून तें कसें मिळावें ! हें प्राप्तव्य

म्हणजेच चिदानंद–अत्युच्चानंद हा होय. आणि खरोखरच एखाद्यानें वासनांचा त्याग केला म्हणजे सर्व आयुष्य अनंदमयच असतें.

पुष्कळ वेळां ते एकमेकांपासून देखिल अज्ञात असतात. जगावर ते पसरलेले आहेत. प्रसंग विशेषीं त्यांपैकीं एक दोन पुरुष एकमेकांस भेटतात, आणि तात्काल परस्परांस ओळखतात; तथापि बहुतांशी ते एकमेकांपासून अलिप्त राहून, मानवी समाजाशींच निगडीत, नव्हे एकजीव-झालेले असतात. उलटपक्षीं अलिप्त असून सुद्धां त्या सर्व विभूति एक रूपच होत. कारण त्यांचा आयुष्यक्रम म्हणजेच ऐक्यशुद्धि होय. त्यांची ती अलिप्तता, तें भिन्नत्व, हींच त्यांस परस्पराकडे आकर्षित असतात. त्यांच्या दृष्टीनें जग म्हणजे एक अफाट निर्जन प्रदेशच होय. असें असून पुन्हां हेंहि म्हणतां येतें कीं, त्यांचा एकांतवास म्हणजेच हा सृष्टीचा पसारा; प्रत्यक्ष गलबल्यांत देखील त्यांस शांततेचा उपभोग घेतां येतो; तथापि ती शांतताहि विश्वबंधुत्वाच्या भावबंधनानें माहिरून गेलेली असते.

जन्मतः वा अन्य रितीनें ते सदासर्वदा निर्धन असतात. तथापि आपलें दारिद्र्य वेंचून, जगावरील कोणत्याहि सुखसमृद्धीचा व राजविलासांचा अंगिकार करण्यास ते तयार नसतात. अखिल विश्वाचे ते बादशाह होत. दैवाचे ते मालिक होत. ऐक्य व समृद्धींचे ते अंतर्बाह्य अधिराज होत. जगावर घडणाऱ्या प्रत्येक चमत्कृतीशीं त्यांचें तादात्म्य झालेलें असतें. तथापि इहलोकीं अशी एकहि गोष्ट नाहीं, कीं जी त्यांच्या समृद्धीस भरती वा ओहोटी आणूं शकेल. ह्या जगतितलावरील कोणत्याहि धनसंपन्नतेंत त्यांच्या दारिद्र्याची बरोबरी करण्याची पात्रता नाहीं. कफल्लक असून सुद्धां वैभवसर्वस्वानें ते नटलेले असतात. सृष्टिगत संपत्ति सर्वस्वाचे तेच मालिक होत.

सर्व प्रकारच्या संकट परंपरेशीं ते पूर्ण परिचित आहेत, त्यांचें आयुष्य देखील सर्व साधारण लोकांप्रमाणेंच क्रांतीमय असतें. प्रसंग विशेषीं तर

त्या क्रांत्या सर्व नाशांतहि परिणत होतात. तथापि जगावरील ह्या तुफान वाऱ्यानें सारें वातावरण जरी भडकलें, तरी त्या महात्म्यांच्या अंतरंगीच्या शांतप्रशांत सागरावर दुःखाची एकहि लाट उठणें शक्य नाहीं. ज्याप्रमाणें तुफान सागराच्या अनेक लाटा भयाण गर्जना करीत असतांना, जलचर बेदिक्कतपणें त्यांतच रहातात, तद्वत् त्या विभूति आपल्या अमूप आत्मशक्तीवर आधार राखून शांत असतात. त्यांचें हृदय त्या भयाण वातावरणाच्या झोल्यांत नानाविध बलात्काराचे झोले घेत स्वस्थ पडलेलें असतें! इतकेंच नव्हे तर, प्रत्यक्ष संग्रामस्थानीं देखील ते शांततेचा अंतिम आस्वाद घेत असतात. बुद्धि सर्वस्वाच्याहि पलीकडील अशी ही शांतता नव्हे काय ? प्रत्यक्ष नरकपुरींत देखील त्यांस दैवी सुरम्यता दिसते.

ही स्थिती कोणत्याहि विशिष्ट धर्म पंथावर अवलंबून नाहीं. प्रत्येक धर्मपंथांत असल्या विभूति निर्माण होऊं शकतात. तथापि साधारणतः ते धर्मबाह्यच असतात. धर्मपंथ हे खालच्या दर्जाचे मार्ग होत. त्या विभूति तर पूर्णत्वावर विहरत असतात. आणि पूर्णत्वावर तर सर्व मार्ग एकवटतात. अशा त्या शैलशृंगावर ते संचारत असतात. हे दैवी पुरुष म्हणजेच सृष्टिदेवतेचे अस्सल पुत्र होत; त्या देवतेस ते मातेच्या आदरानें सन्मानितात. जर सृष्टिविषयींच आस्था नसेल तर स्वर्ग तरी कोठें मिळणार? ते दैविपुरुष मर्त्यलोकांसहि स्वर्गतुल्य बनवूं शकतात. आणि ह्याच मर्त्यलोकीं ते स्वर्गीय आयुष्याक्रमण करूं शकतात. खरोखर सृष्टि ही मनुष्याला स्वर्गापासून केव्हांहि परावृत्त करीत नाहीं; परंतु मनुष्यमात्र तीस स्वर्गापासून अलिप्त करितो. तसेंच तो आपल्या कुकर्मानें जसा तिला नरकतुल्य बनवितो, तोच अंतःकरणांत उत्कटेच्छा असल्यास तिला स्वर्गाचें साक्षात् नंदनवनहि बनवूं शकेल. नाहीं! स्वर्गीय आनंदापासून मनुष्याला च्यूत करणें हा सृष्टिचा गुणधर्मच नव्हे; त्याकरितां कांहीं त्याचा पिंड सृजित झाला नाहीं. असलें अघोर कर्म करविणारी त्याची अहंमन्य सैतानी मनःप्रवृत्ति हीच होय. ज्या कोणास ह्या सृष्टिवर स्वर्गसुखाचा आस्वाद घेतां येत नाहीं, त्यास स्वर्ग अन्यत्र कोठेंहि लाभणार

नाहीं. अहंमन्यता ही मुलतःच स्वभावाला पुजलेली आहे. जो अहंमन्य या भूतलावर कष्टी आहे, तो स्वर्गाच्याहि स्वर्गांत गेला तरी दुःख भोगित रहाणारच ! ज्यानें अंतर्यामीच्या दुःखयातना आणि त्यांची कारणें यांवर विजय संपादन केला नाहीं, त्यास स्वर्गतरी कोणता आनंद देणार ? ज्याच्या हृदयांतच मुळीं स्वर्ग नाहीं, तो स्वर्गांत तरी काय रहाणार ?

सर्व धर्म ज्यांस स्वर्ग असें मानतात, तें अधोगतिपासून जितकें दूर आहे, तितकेंच ह्या महात्म्यांचें निवासस्थान आम्हांपासून दूर अंतरावर असतें. मानवी सौख्यास ते आपत्तिच म्हणतात. दुःख आणि सुख हीं परस्परांपासून जितकीं भिन्न, तितकाच त्या परमपुरुषांचा चिदानंद आम्हां मानवी सौख्यापासून भिन्न होय. सौख्य हें मूलतःच दुःखोत्पादक असतें. ज्याचा आनंद निर्विकल्प व निर्वासनात्मक नाहीं, त्याचें सौख्यच दुःखोत्पादक ठरतें. जेव्हां एखादा मानव आपल्या अस्तित्वाचीं सर्व बंधनें झुगारून देऊन, चराचर वस्तुमात्राचें ठायीं अदृश्य असलेल्या महानंदांत एकतान होतो, तेव्हांच त्यानें त्याच्या दुःखांची समाधी घेतली असें म्हणतां येईल. कारण ह्या सर्व चराचर वस्तू म्हणजेच त्या चिदानंदाचीं व्यक्त स्वरूपें होत.

उपनिषदें कंठरवानें हीच घोषणा करित आहेत,—" ज्यापासून विद्यमान चराचराची उत्पत्ति आहे, ज्याच्या योगानें सजीव प्राणी कांहीं काल ह्या सृष्टिवर वास करून परत ज्याकडेच जातो, त्याचा शोध करा." ही सृष्टोत्पत्ति त्या सच्चिदानंदा पासूनच होय; त्याच्या योजनेनेंच तिचा क्रम चालू असून, त्यांतच तिचा लय होणार. त्याच्या अहंमन्यतेचा कोंडमारा करणाऱ्या बंधनाचे पाश तो तोडूं लागला, आणि जें अनाद्यंत, अमर्याद, अभंग, दोषरहित व निराकार असें अद्वैत आहे, त्यांत लीन होऊं लागला, म्हणजेच त्याची निजधामास जाण्याची तयारी झाली असें समजावें. तसेंच कित्येक लोक मोठमोठाले यज्ञ याग करितात;—होय, ममत्वाचा तरी एक यज्ञच असतो—तेव्हां वाटेल त्या दुःखापदा व जगाविषयींचें औदासिन्य पत्करून, कडकडीत एकाग्रतेच्या बलावरच, परमात्म्याच्या प्रकटिकरणार्थ व्यक्तिगत साधनें उत्पन्न करण्याकरितांच त्यांनीं

सर्व संग परित्याग केला असें म्हणतां येईल. मानवानें आत्मोत्पत्तिचें नियोजित कार्य तडीस नेल्यास, त्यास त्याचें पारितोषकहि मिळतें, आणि त्या ईश्वरी खेळाचा स्वतंत्र वाटेकरी होऊन, शेवटीं त्या अतर्क्य, अवर्णनीय, अशा सच्चिदानंदाविषयींचें ज्ञान प्राप्त होतें.

हें कांहीं तत्व नव्हे. ज्याप्रमाणें सदसद्विवेक बुद्धिनुरूप प्रचलित कायदे अस्तित्वांत आलेले आहेत, तद्वत् त्या पौराणीक ज्ञानाच्या अमर निर्झर-प्राप्ती करितांच तत्वेंहि पुरीत झाली आहेत. त्रिकालाबाधित असा हा अभिन्नानुभव होय. कित्येक देवदूत याविषयींच्या गोष्टी सांगतात, आणि प्रत्येक त्याचें वर्णन निरनिराळ्या शब्दांत करीत असतो. कारण त्या व्यक्त करण्याचे नानाविध मार्ग होत. तसेंच कित्येक असेहि आहेत कीं, जे त्यांचा मुळीं उच्चारच करीत नाहींत. कारण त्यांस हें माहित असतें कीं, त्या गोष्टी जाणण्याचा निनांत शांत असा एकांतवास हाच फक्त खरा मार्ग होय. वाचा त्यास व्यक्त करूं शकत नाहीं, मन जाणूं शकत नाहीं. तथापि ते बोलत वा मुग्ध व्रताचा अंगिकार करोत, जे त्यांच्या जीविताकडे आदर भावानें बघणारे आहेत, त्यांस ते स्वोदाहरणानें तेंच तत्व साक्षात् प्रगट करून दाखवितात. त्यांच्या अस्तित्वाच्या ह्या जिवंत शिक्षणांत जरूर त्या सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो. ज्या एकमात्राची अखिल मानवसृष्टि मार्गप्रतिक्षा करीत असते, त्याचेंच ज्ञान त्या शिक्षणामुळें तीस प्राप्त होतें, कारण तो एकमात्रच तिचा सौख्यदाता होय.

त्या देवदूताच्या शोधनार्थ मी अखिल पृथ्वीवर भ्रमण केलें आहे, सृष्टिच्या त्या समष्टिरूप आत्म्याला ऐक्यबिंदुत अवतार घेण्याचा क्षण आतां येऊन ठेपला आहे. कारण ह्या ईशसृजित सृष्टिंत जसे कित्येक शेतकरी गुराखी असतात, तसेंच इतर कित्येक मानवराखी नेतेहि असतात. पृथ्विच्या ह्या अफाट क्षेत्रावरील ते सेनानी होत. भौत्तिक शास्त्राचे पुरस्कर्ते जसे ह्या जगावर आहेत, तसेच इतर कित्येक स्वर्गीय तेजोगोलाचे किरणरूपहि आहेत. कित्येक लोक आपल्या आत्म्यास विश्रांतच राहूं देतात, आणि कित्येक ईश्वरी कार्याचे अधिपति—भविष्याचे उत्पादक

आपलें कार्य करीतच असतात. परमेश्वर सर्वांनाच्या आपल्या आनंदाचा वाटेकरी करीत असतो. तथापि त्याच्या शक्यंशाचे वाटेकरी होण्याचा दैवयोग थोड्यांसच प्राप्त होत असतो. पुराणांतरिंच्या कथा, अथवा चरित्राख्यायिकांतील मुख्य नायकाच्या अद्भुत गोष्टींवर आजचें हें नवमतवादी जग क्वचितच विश्वास ठेवितें. असल्या विभूति इतउपर जगास दुर्मिळ असल्या तरी, पुनः एकवार संचार करणार ! त्या नामरहित विभूति सहज एका अंगविक्षेपानेंच सर्व राष्ट्रांतील भूतकालीन स्थितीचा भाविअवतारापुढें चुराडा उडवूं शकतात.

असल्या ह्या देवदूताच्या शोधनार्थ मी हा भूगोल पादाक्रमण केला आहे. जिला केवळ डोकें टेकण्या पुरती देखील स्वतःची अशी जागा नाहीं, अशी एक स्थानरहित विभूति आपल्या हृदय मुदित गानाचा मंजुघोष करीत, आणि लोकांना त्या परमानंदाचा उपदेश करीत, भटकत असलेली माझ्या अवलोकनांत आली. दुसरा एक, लक्षावधी लोकांचा धर्माधिकारी असलेला भविष्यवेत्ता पुरुष मला भेटला; आणि तिसरा तर यांहिपेक्षां अधिक उच्चत्वास पोंचलेल्या, भविष्यत्कालानें केवळ वरलेल्या एकांतप्रिय पुरुषाचें मला दर्शन झालें. या सर्वांभोवती तरुणांचा नव्हे– ते तरुण देवच होत–घोळका असे; देवकन्यारूप अशा स्त्रियाहि त्यांच्या मागें असतात. परंतु त्या देवकन्यांचा पडदा बाजूस सारून त्या पुरुषास जगाच्या दृष्टिपथावर आणण्याचा अधिकार तरी कोणास आहे ?

असल्या साधूवर्यांच्या शोधार्थ त्रिखंड परिभ्रमण करीत असतां मी येथपावेतों येऊन पोंचलो. उदयाचलीच्या पूर्वक्षितिजावर आतां सर्वांनीं एकत्र झालेंच पाहिजे. तसेंच अस्ताचलींच्या पश्चिमगोलार्धानें त्या परमविभूतीचे बहुतांश उत्पन्न केले पाहिजेत. त्या एकस्वरूपी परमपुरुषाला निरनिराळ्या नांवानें ओळखीत, आज अखिल मानवजात आतुरतेनें मार्गप्रतीक्षा करीत आहे. जेव्हां त्या सर्वांचें ऐक्य होईल, तेव्हां त्या विभूतीचा अवतार होणारच.

# श्री अरविंद–घोष.

माझ्या मित्रांनो ! केवळ वाचाच नव्हे, तर साक्षात् अंतःकरण मी तुम्हांकरितां येथें आणिलें आहे. तुमच्या ह्या सर्वांगीण सुंदर अशा तरुण समितीस मी अंतःकरणपूर्वक प्रणाम करतों; कारण, मला अत्यंत प्रिय अशा दोन्ही गोष्टी येथें संकलित झालेल्या आहेत. पहिली म्हणजे प्रेम,–एशियाविषयींचें मातृप्रेम–हीं होय; एशिया ही जगाची आध्यात्मिक माता होय. आणि दुसरें तारुण्य,–तारुण्य हेंच भविष्याचा आधाररूप होय;–त्याविषयीं पुत्रप्रेम. कारण एशियाची म्हणजे पर्यायानें जगाची भवितव्यता आपल्याच ठिकाणीं केंद्रीभूत झालेली आहे.

जें कार्य झालें हें पाहिजेच तेंच तुम्हीं करीत आहांत. निरनिराळ्या देशांतील विद्यार्थ्यांत बंधुप्रेमाचें उत्पादन तुमची ही समिती करीत आहे. अर्थात् हें उत्पादन त्या त्या राष्ट्रांदरम्यानच होय. एशियांतील विचारक्षम तरुणांत ऐक्य घडवून आणणें म्हणजे, प्रत्यक्ष एशियाचेंच ऐक्य करण्यासारखें होय. भावि एशियाचें हें एकिकरणच होय. कारण उद्यां एशिया एक होणार. ह्या ऐक्यांतच एशियाचें भविष्य अंतर्भूत होतें. उच्चजीवन, व जें जें म्हणून सर्वोत्कृष्ट आहे, त्या सर्वांचें जेथें म्हणून एकिकरण होतें अशी शाश्वत सुधारणा, हीं त्या भविष्याची दोन प्रमुख अंगें होत. जपानचा समंजसपणा, चीनची बुद्धिमत्ता, आणि भारतवर्षाची आध्यात्मिकता, हीं सर्व त्या भविष्यांत एकरूप झालेलीं दिसतील. त्याचा आत्मा एशियाच्या उदात्त कल्पनांनीं भारला जाईल. वैदिकधर्म, शिंटो, बौद्ध, आणि टाओ, तसेंच ख्रिस्ती आणि इस्लाम, हें सर्व धर्म तेथें एकवटतील. कारण त्या एकाकार ईश्वराचीच तीं निरनिराळीं स्वरूपें होत.

भविष्यत्कालाचा उपरोक्त आत्मा भावी पिढीच तयार करील. अहंकार व आत्मप्रतिष्ठा यांचें जनन करणाऱ्या ज्या सुधारणेनें जुन्या जगाचा नाश केला, त्या सुधारणेचा प्रवर्तक तो आत्मा नव्हेच; परंतु नूतन सृष्टिची

मांडणी करणारा, ईश प्रणित मानवी परमपुरुष हा एशिया पुत्रच असणार. त्याच्या उत्पत्ति करितांच जगावर असा उल्कापात होत आहे. त्या अवताराकरितांच आजचे हें जग क्रांतिमय बनून, जुन्या स्थितीविरुद्ध बंडाळी करीत आहे. त्यांस आतां त्या स्थितींत मुळींच रहावयाचें नसून, मानविकर्तव्याच्या व्याख्या सांगणाऱ्यांचें हें जग मुळींच ऐकत नाहीं, त्याचें कारण तरी हेंच आहे कीं, असल्या दैवी पुरुषाच्या अवताराची शक्य कल्पना त्यांच्या हृदयांत घर करून बसली आहे.

म्हणून मी तुम्हांस हेंच बजाविण्यास आलो आहे कीं, त्या सुमंगल भविष्यत्कालाची तयारी करा ! आपल्या अंतःकरणांत त्यास अधिष्ठित करा; कारण मोठमोठ्या गोष्टींचा समय आतां आलाच. एशियांतील थोर विभूति लवकरच येणार; सर्व जगभर त्यांचा तपास करीत, सारें आयुष्यभर मी हिंडत आहे. माझा तर पूर्वींपासूनच असा विश्वास होता कीं, त्यांचें अस्तित्व या सृष्टिवर कोठें तरी असलेंच पाहिजे. त्यांच्या अभावी सृष्टिक्रम चालणेंच शक्य नाहीं. कारण ह्या सृष्टिचें तेज, चैतन्य, व जीवन म्हणजेच त्या विभूति ! अशांपैकीं सर्व-श्रेष्ठ भविष्यत्कालाचा केवळ आधार, असा एक पुरुष शेवटीं मला एशियांतच भेटला.

तो पुरुष हिंदु असून त्याचें नांव अरविंद घोष होय ! कलकत्ता शहरीं ता. १५ ऑगस्ट १८७२ या मांगल्यपूर्ण दिवशीं यांचा जन्म झाला. आज ते ५० वर्षे वयाचे आहेत. विद्यार्जनाकरितां अगदीं अल्प वयांतच त्यांस विलायतेस पाठविण्यांत आलें. तेथें चौदा वर्षे राहून त्यांनीं सर्व पाश्चिमात्य ज्ञान संपादन केलें; तथापि त्या पुरुषास तें ज्ञान अपुरें होतें. अरविंद बाबू पौर्वात्य ज्ञान व शास्त्रांत देखील पारंगत आहेत. वयाच्या विसाव्या वर्षी हिंदुस्थानांत त्यांचें पुनरागमन झालें. बडोदें संस्थानांत त्यांस महत्वाचे कामावर नेमण्यांत आलें होतें. ह्या अत्यंत किफायती धंद्यानें पुष्कळांच्या महत्वाकांक्षेचें शमन झालें असतें तथापि त्यांची महत्वाकांक्षा कांहीं निराळ्याच स्वरूपाची होती, त्यांच्या अंतः-

करणांत भारत मातेविषयींचें अत्युत्कट मातृप्रेम विलसत होतें. अर्थात् त्यांनीं लागलीच अशी प्रतिज्ञा केलीं. 'माझ्या भारतमातेच्या उरावर अत्यंत अवजड असें दडपण पडलेलें आहे. त्याचा उच्छेद करून मातृ-भूमीस मुक्त केल्याविना मी क्षणभरहि विश्रांति घेणार नाहीं' ह्याचवेळीं त्यांनीं दुसरीहि भीष्म-प्रतिज्ञा केली, "ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन केंव्हां तरी घेईनच घेईन" अशी प्रतिज्ञा करून, त्यांनीं बडोदें संस्थानांस रामराम ठोकला. आपल्या वैभवसर्वस्वाचा गौतमबुद्धानें जसा एकेकाळीं त्याग केला, तद्वत् अरविंदानीं देखील आपल्या वैभवसर्वस्वास तिलांजली देऊन, साहसपूर्ण अशा आपल्या कार्याच्या सिद्ध्यर्थ ते त्या दिशेकडे वळले.

बडोद्याहून कलकत्त्यास परत आल्यानंतर त्यांची पहिली कामगिरी म्हणजे राष्ट्रीय विद्यापिठाची स्थापना ही होय. कारण, सांप्रतच्या ब्रिटीश-राज्यपद्धतीच्या तडाक्यांतून प्रथम आपल्या तरुण बांधवांना मुक्त करणें अत्यावश्यक होय असें त्यांस वाटलें. त्यांचें दुसरें कार्य म्हणजे 'वंदे-मातरम्' हें वर्तमान पत्र सुरू करणें. 'वंदेमातरम्' च्या विस्तृत कार्य-क्षेत्रांत त्यांनीं उत्साही तरुणांचा एक संघ तयार केला. लेखनाबरोबरच व्याख्यानांचीहि त्यांनीं झोड लाविली. तोंडावाटे उमटणारे बोल त्यांच्या आत्म्यापासून येत असल्यामुळें त्या जाज्वल्य सिंहनादानें बंगाल खड-बडून जागा झाला. तो काल म्हणजे हिंदु उत्कर्षाचा-राष्ट्रीय चळवळीचा प्रारंभकाल होय. ही चळवळ दिन प्रतिदिन प्रांताप्रांतांतून पसरत गेली, आणि शेवटीं तिनें सर्व देश व्यापून टाकिला. चळवळीची आज होणारी अनिवार्य प्रेरणा म्हणजेच उद्यांचा विजय होय !

ह्यानंतर त्यांस सरकारचा पाहुणचार भोगावा लागला. तुरुंग म्हणजे एकप्रकारची न्याय व महत्तेची पाठशालाच होय. तथापि त्यांजवर कोणत्याहि प्रकारचा गुन्हा केल्याचा आरोप सिद्ध होऊं न शकल्यामुळें एक वर्षानंतर त्यांस मुक्त करावें लागलें. अथवा होय ! त्यांचा एक मोठा गुन्हा होता खराच, आणि तो हा कीं, आपल्या भारतमातेच्या स्वातंत्र्योद्धाराची मेघगर्जना करणारे ते ईशप्रणित पुरुष होत. तुरुंगांत

असतांना त्यांच्या असेंहि अनुभवास आलें कीं, मानवी शक्ति महत्कार्यांत अगदींच अपुरी असते. दैविशक्तीची जोड ही तीस मिळालीच पाहिजे. ईश्वराशीं आपलें संभाषण झालेंच पाहिजे. तेव्हांपासून ते ध्यानमग्न स्थितींत राहूं लागले; आणि त्यांस प्रत्येक प्राणिमात्राचे ठायीं ईशत्त्वाचाच भास होऊं लागला. जेव्हां कोर्टापुढें त्यांची चौकशी चालू होती, तेव्हां त्यांस असलाच अनुभव आला कीं, आपणापुढें जज्ज, जेलर, वा इतर कोणीहि उभे नसून, भगवान् श्रीकृष्णच अनेक व्यक्तिंच्या रूपानें त्यांचे ठायीं नटलेला आहे.

पुढें त्यांनीं ' कर्मयोगीन् ' नांवाचें मासिक चालविलें, व तद्वारें जनतेस एक संदेश ध्वनित केला. ' आत्मिक मुक्तिशिवाय भौत्तिक मुक्ति केव्हांहि मिळणार नाहीं ' हाच तो दिव्य आदेश होय. नंतर एकांतवासाकरितां ते दक्षिण हिंदुस्थानांत पॉंडेचरी येथें आले. ह्याच स्थलीं दहा वर्षांपूर्वीं ईशसंकेतानुसार मला त्यांच्या भेटीचा प्रथम लाभ झाला. तेथें मौनव्रत धारण करून त्यांनीं योगाभ्यासास प्रारंभ केला. पांच वर्षांनंतर त्यांची योगसाधना फारच गुढ स्वरूपाची बनली. त्या पांच वर्षांनंतर जेव्हां मी त्यांस पुन्हां भेटलों, तेव्हां माझ्या प्रत्ययास असें आलें कीं, त्यांना कांहीं तरी दिव्यतेज, व शक्ति हीं साध्य झालेलीं आहेत. त्या तेजोबलानें स्वर्ग, मृत्यू, पाताळ, वा अंतराळींची कोणत्याहि इतर सृष्टींतील कोणतीहि गोष्ट त्यांजपासून गुप्त राहूं शकत नाहीं. तसेंच त्यांच्या त्या आत्मशक्तिच्या योगानें कोणत्याहि स्थितींत ईश्वरी संकेत काय असावा हें त्यांस सहज ओळखितां येतें.

त्या गोष्टीला आज पांच वर्षें झालीं. ह्या पंचवार्षिक मुदतींत माझ्या विनंतीवरून, त्यांनीं आपल्या मासिकांत अत्यंत अधिकार युक्त, अतिशय गंभीर, व विद्वत्ता प्रचूर, तसेंच आजपावेतों कधींही न लिहिले गेलेले, असे वेदांतविषयक पांच लेख लिहिले. आपल्या अव्यक्त—दुर्बोध—अशा एकांतातून हिंदभूचा तो त्राता आतां लवकरच बाहेर पडणार. सूर्य

तेजानें झळकणारा तो महापुरुष, एशियाचा गुरु, व जगाचा शास्ता होणार. पहा ! जगाचे शास्ते वा गुरु जेव्हां जेव्हां म्हणून निर्माण झाले, तेव्हां ते एशियांतच उत्पन्न झाले आहेत !

त्या पुरुषांच्या नांवाचा प्रथमोच्चार आजच जगापुढें मी करीत आहें. आणि खरोखरच हा आद्यध्वनी तुम्हींच ऐकावयास पाहिजे होता. त्यांचें हें नांव, तुमच्या समितीपुढें, एशियांतील तरुणांपुढें, अखिल एशियापुढें ध्येय चिन्ह म्हणून ठेवा. हें नांवच मुळीं एशियाची मुक्ति सुचवित आहे. एशिया आपल्या किर्ती—वैभव—पदारुढ होणार, हीच गोष्ट हें नांव सिद्ध करीत आहे.

# भविष्यकालीन–भारत.

भावी भारतवर्षाचे नागरिकहो:—

मी आपणाशीं केवळ फ्रेंच भाषेंतूनच बोलू शकतों याबद्दल मला क्षमा करा. ज्या लोकांत माझें वास्तव्य आहे, त्यांची भाषा मला अवगत नसल्यामुळें, एकांतवास व मौनव्रत या दोहोंचा मधुसंमिश्रित लाभ होऊन, तीं उत्तरोत्तर वृद्धिंगत होत आहेत; अशामुळें अर्थातच ईशनिनाद ऐकण्याची संधीहि मला प्राप्त होते.

हिंदुस्थानाची भाषा मला येत नाहीं, आणि याच कारणामुळें त्याचें आत्मगान मी ऐकूं शकतो. कोणताहि समाज झाला तरी, जोपावेतों त्याचा आत्मा आपल्याशीं बोलूं शकत नाहीं, तोपावेतों आपण तरी त्या समाजाच्या आत्म्याशीं कसें बोलूं शकणार ?

क्षमा करा ! मी एक गरीब मानवी प्राणी आहे. मला ना माझा देश, ना माझें राष्ट्र ! माझ्या राष्ट्राचें जनन अद्यापि व्हावयाचें आहे. तसेंच माझा देशहि आज अनिर्मितच आहे. ह्यामुळें मी परदेशी बनलों असून देखील, अखिल दुनियेचा रहिवाशी झालों आहे. सर्व राष्ट्रांतून माझ्या अनागत

राष्ट्राचा शोध करीत मी त्रिखंड भ्रमण करित असतों. हें भावी राष्ट्र कसें असेल ? अर्थात् ज्याला स्वार्थ नाहीं, भौगोलिक मर्यादा नाहींत, सकुं-चितता नाहीं वा बंधन नाहीं, जेथें रुढीचें प्राबल्य नाहीं, संशयाला थारा नाहीं, आणि जातिनिर्बंधहि नाहींत; जेथें अंत्यज नाहींत, अथवा त्यांना स्थानहि नाहीं, अशा प्रकारचें निकोप, निर्लेप, असें तें बालराष्ट्रवत् असणार.

त्या भावी राष्ट्रांत अज्ञान वा उपासमार हीं नसणारच. तेथील महात्मे निर्धन, तर गर्भश्रीमंत अभिलाषाशून्य. त्या देशांत ईशोपासनेकरितां प्रभू प्रतिनिधिंचा–पुजाऱ्यांचा–निखालस निराळा असा वर्ग नसणार; कारण प्रत्येक मनुष्य हक्कसिद्धतःच परमेश्वराचा पूजक व सेवक असूं शकतो !

आज नूतन वर्षागमनकालीं, व नवयुगीन संक्रमण समयीं या नव-ज्योत्स्नामय भारत वर्षाला मी असें सांगण्यास आलों आहे कीं, " तूंच तो भावी देश हो, तूंच तें बालराष्ट्र हो. " अलम दुनियेंतील सर्व राष्ट्रांत तूंच आत्मनिष्ठ राष्ट्र आहेस; मग अखिल मानव जातीला धार्मिकतेचा धडा शिकविणें हेंच तुझें विधिलिखीत कार्य नव्हे काय ? एके काळीं तर तूं विश्वप्रकाशक ह्मणून नांव गाजविलें आहेस, आतां पुन्हां ज्ञानदीपक हो.

पण तसें करतानां ममत्वाचा गर्व वाहूं नको. तूं असें तर मानूंच नये कीं आत्मनिष्ठ राष्ट्र कायतें मीच ! कोणतेंहीं राष्ट्र काय किंवा व्यक्ति काय, जेव्हां असें मानूं लागतें कीं मीच सर्वात श्रेष्ठ, तेव्हां हेंहि नक्की सम-जावें कीं, त्याच्या अवनतीला सुरवात झालीच ! मी म्हणजे श्रेष्ठ प्रतीचें एक राष्ट्र आहे, अथवा ईशप्रिय असे मानवी समाज कायते माझ्या ठिका-णींच वास्तव्य करीत आहेत, अशी भावना तूं मुळींच बाळगूं नकोस; कारण, अशीं पुष्कळ राष्ट्रें आहेत कीं जीं स्वतःस स्वयंश्रेष्ठ समजतात, तथापि जें राष्ट्र स्वतःचा असा केव्हांहि विचार करीत नाहीं, आणि परसेवेंत एक-लीन होऊन स्वतःचेंहि भान विसरून जातें, त्यांसच श्रेष्ठ राष्ट्र म्हणतां येईल. दुसऱ्या राष्ट्रांच्या भावी सुखाकरितां म्हणून, जें राष्ट्र आपल्या भूतकालीन बंध पाशांतून प्रथम मुक्त झालें असेल, तेंच श्रेष्ठ राष्ट्र होय. नव्या कल्प-

नांनीं नूतन राष्ट्र निर्माण करण्याकरितां प्राचिन कल्पना, मतें, आणि रुढी, या सर्वांचा ज्या राष्ट्रानें प्रथम संन्यास केला, तेंच राष्ट्र श्रेष्ठ दर्जाचें होय.

तसेंच सर्वांचे शास्ते होण्याची धमक आणण्याकरितां जें राष्ट्र प्रथम शिष्यत्वाचा अंगिकार करतें तेंच श्रेष्ठ. दुसऱ्यांचे ठायीं जो चैतन्यधर्म व जें चैतन्यजीवन प्रकट करावयाचें, त्याचा साक्षात्कार ज्यास प्रथम घडवून घेतां आला, तेंच श्रेष्ठ राष्ट्र होय. आत्म्याला पटलें म्हणजे आत्मिक जीवन प्राप्त झालें असें मुळींच नव्हे. आध्यात्मवाद आणि आध्यात्मिकता हीं एक नव्हेतच. ह्या भूतलावर असे अनेक महाभाग आहेत कीं ज्यांस आत्मा ही कल्पनाच कबूल नाहीं. आणि यद्यपि हे लोक स्वतःस जडवादी म्हणवितात, तरी त्यांचा सर्व चरित्रपट आध्यात्मिकतेच्या उत्कृष्ट कृतींनीं रंगलेला असतो. उणीव हीच कीं, या चरित्रावर अधिभौत्तिकत्वाचा शिक्का मोर्तब मात्र नसतो. तसेंच जे स्वतःस आध्यात्मवादी म्हणवितात, त्यांच्यांतहि ती चिच्छक्ति पूर्णतः नसते. चैतन्यमय जीवन म्हणजे जडवादाचा अभाव, असा त्या जीवनाचा अर्थच होऊं शकत नाहीं. तसेंच चैतन्य हें जरी जडाची अपेक्षा करित नसलें तरी, उलटपक्षीं जडत्वच त्यास व्यवस्थित स्वरूप देतें; जडाला अशा रीतीनें चैतन्य येतें, आणि मग चैतन्याला सुंदर स्वरूप प्राप्त होतें.

खरा जडवाद आत्म्याच्या अहंकारांत आहे. स्वरूप भिन्नत्वामुळें आलेल्या मंदपणांत आहे. तसेंच तें पार्थीव अज्ञानांधःकार नाहींसा करण्याच्या कार्याचा अनादर करण्यांत आहे. आध्यात्मिक जीवन म्हणजे कांहीं आध्यात्मिक सांप्रदायाच्या बाह्य विधींचें प्रदर्शन नव्हे. आत्मा नाममात्राला केव्हांहि चिकटून रहात नाहीं. उलट त्यास नाविन्य मात्र आणतो. बाह्यस्वरूप, विधिसूचित पुराणप्रियता न सोडण्याचा आग्रह, प्राचीन ग्रंथ व संस्काराविषयींचा संशय, निश्चेटता, ( दिकालाचे बंधन ) आत्म्याचें वैशिष्ट्य, पुरुषार्थाचा अभाव, नटवेगिरीची अनिच्छा, हीं सारीं खऱ्या जडवादाचीच लाक्षणिक चिन्हें होत. खरा जडवाद प्रायः धर्म व जीवनांतच प्रगटतो.

हे हिंद भू ! बा आत्मनिष्ठ राष्ट्रा ! या आंतरिक जडवादावर विजय मिळविणें, आणि भूतकालाला मूठमाती देऊन भविष्यांत जन्म घेणें हाच तुझा आदेश होय. कारण, व्यक्तिप्रमाणेंच राष्ट्रालाहि पुनर्जन्मा-करितां मेलें हें पाहिजेच. नवा जन्म पाहिजे असेल तर, जुनें कलेवर टाकलेंच पाहिजे. सूर्याचा अस्त झालेल्या अंधाऱ्या दिशेकडे पहात बसून, ' आसित् पुरा प्रकाशोऽत्र ' या मंत्राचा जप करणारें राष्ट्र दुर्दशेला पोंचल्यावांचून रहाणार नाहीं.

वृद्ध मनुष्याप्रमाणें हरवलेल्या भूतकालाच्या शोधनार्थ व्यर्थ कालक्षेप करणाऱ्या राष्ट्राचा धिःकार असो; त्या राष्ट्राला जन्म—मरण अथवा पुनरु-ज्जीवनाचें मर्मच अवगत नाहीं असें म्हटलें पाहिजे. तुम्हीं आत्मनिष्ठ प्रजाजनांनों, पुढें भविष्य कालाकडे पहा ! सर्वस्वाचा त्याग करा. अशानें दुसऱ्यापाशीं जें आहे तें तुम्हांस मिळेल काय ? नाहीं; तुमचें प्राप्तव्य अद्याप कोणासहि मिळालेलें नाहीं. तुम्हींच तें इतरांना पुरविलें पाहिजे. भूगोलांतर्गत अशा अत्यंत प्राचीन राष्ट्रांपैकीं तूं एक आहेस. भव्य आणि उज्वल असा ज्याचा भूतकाल, त्यानें सुद्धां त्या यशोदुंदुभीच्या कडेलोट विवरांत कां पडून राहूं नये, हें अखिल राष्ट्रांना शिक-विण्याचें कार्य तुझेंच नव्हे काय ? आज हजारों वर्षांपासून तुझा आत्मा इहलोकींची बंधनें तोडून भविष्यांतील गोष्टी व भविष्यकालीन जीवन हीं शोधण्याकरितां परलोकीं गेला आहे. तोच स्थितप्रज्ञ आत्मा आपलें अप्राप्य असें स्थान सोडून देखील विजयशाली जीवनाचे प्रकार व प्रकृति निर्माण करण्यास इहलोकीं परत येण्यास समर्थ आहे, हें दुनियेला सिद्ध करून देण्याचें कार्य तुझें नव्हे काय ?

भविष्यकालीं गुलामगिरीपासून पाशमुक्त होणाऱ्या पण आजच्या बद्ध भारतवर्षा ! अंतर्बाह्य नाविन्यानें नटलेलें, अंतरंगाचें संपूर्ण परिवर्तन झालेलें, एखादें राष्ट्र भूतकालाचीं बंधनें तोडून स्वावलंबनाचे पायावर आध्यात्मिक स्वातंत्र्य कसें मिळवूं शकतें, हें दुनियेला पटवून देण्याचें

कार्यहि तुझेंच नव्हे काय ? अनेक राष्ट्रांशीं संबंध जडलेल्या विभिन्न राष्ट्रा, तुझे जीवनप्रश्न, तुझें कार्य, आणि तुझी समस्या, हीं अलम दुनियेंत विशिष्ट प्रकारचीं असून खडतर आहेत. भिन्न भाषा आणि भिन्न सांप्रदाय यांचें तूं म्हणजे एक प्रचंड आगरच ! मग तलवारीच्या भेसूरतेनें नव्हे, तर प्रेमाच्या मंगल न्यायानें राष्ट्रैक्य कसें होऊं शकतें; तसेंच बळजबरीच्या इच्छाभोगानें नव्हे, तर प्रेमाच्या अभिलाष इच्छेनें साम्राज्य प्रस्थापना कशी करितां येते, हें जगाच्या प्रत्ययास आणण्याचें पवित्र कार्य तुझेंच होय.

अनेक धर्म व त्यांचीं परस्पर विरोधाभासित मतांतरें, तसेंच अनेक कलहोत्पादक सांप्रदाय, या सर्वांचा स्वाहाकार करून, त्यांस एका अनंत परमेश्वरी सेवावृत्तींत निमग्न करितां येतें, हें जगाला स्वोदाहरणानें पटवून-देण्याचें कार्य तुझेंच नव्हे काय ? जगांत अत्यंत विस्तृत आणि प्रजाधिक्य असलेला असा तूं एक देश आहेस; मग लोखंडी पिंजऱ्यांत स्वतःला जखडून ठेवून नव्हे, तर सर्व पाशबद्धतेस जलांजुली देऊन विश्वमैत्रीच्या पायावर शांत, आनंदित, व स्वयंसंतोषित असें मनुष्यजातीचें एक आदर्शभूत कुटूंब होण्यांतच राष्ट्राची खरी महति आहे, हें दुनियेला दर्शविण्याचें कार्य खरोखर तुझेंच आहे. म्हणून आत्मनिष्ठ प्रजाजनांनो ! जागृत व्हा, उठा, आपली जन्मपत्रिका उलगडून पहा. प्रेम व श्रद्धा या दोन पंखांनीं आकाशांत अंतराळीं उच्च भराऱ्या मारून आत्मविहार करा. श्रद्धेनें भविष्यांशीं तर प्रेमानें जगाशीं संलग्न व्हा.

स्वतंत्र होण्याकरितांच म्हणून केवळ नव्हे तर ‘ महान् ’ होण्याक-रितां उठा. स्वातंत्र्यास स्वतंत्र असें अस्तित्वच नाहीं. तेजस्विता ही जशी सूर्याची छाया आहे, तद्वतच जें कांहीं महत्, त्यांतूनच स्वातंत्र्य हें परि-णत होत असतें. कित्येकांची इच्छा इतकीच कीं, तुम्हीं एकदां स्वतंत्र होऊन इतर राष्ट्रांप्रमाणें पार्लमेंट स्थापून, ( Stock-exchange ) स्टॉक एक्सचेंजचीं कोडीं सोडवित बसावें. मग ह्या द्राविडी प्राणायामांतच तुमचा आत्मा लीन होणार. कित्येकांस वाटतें कीं, तुम्हीं युरोपियन राष्ट्रांची हुबेहुब नक्कल करून त्यांच्या जरीपुराण्या मूर्ति मिळवाव्या, व आपल्या

देवता त्यांस देऊन टाकाव्या. तथापि तुमच्या अभिजात् चैतन्यवृत्तिंचा निर्धार मात्र निराळाच आहे. तुमचा देश हा एक दैविराष्ट्र बनावें अशी तुमची भावना आहे. त्या दैवि राष्ट्रांत मुत्सद्याच्या जागा महात्मे भरून काढतील, धनार्जितांचें स्थान ऋषीमुनी संपादितील, तेथील मध्यवर्ती मंडळांत महात्मेच विराजमान होतील, त्यांचेवर उच्च कोटींतील मानवांचेंच एक मंडळ असेल, आणि ह्या मंडळावर भगवंताची मूर्ति—अखिल जनतेचा स्वामी—मानव सम्राट याचें सिंहासन असेल.

वा, आर्यावर्ता ! आज इतर देश जसे आहेत, तसेंच केवळ तुला व्हावयाचें नाहीं; तसेंच ज्या स्थितींत आहेस, त्यांतहि रहावयाचें नाहीं. तुझ्या हृदयस्थ विकारवृत्तीनें केलेलें पाप तुझें तूंच धुवून टाकिलें पाहिजे; तें पाप तूं जाणत आहेस. आज असें मानण्यांत येत आहे कीं, अस्पृश्यता हें राष्ट्रीय पाप होय; तथापि मी तर असेंच ह्मणतों कीं प्रत्येक भेदभाव हें पापच आहे. अस्पृश्यता हा त्या पापांचा एक दृश्य परिणाम होय इतकेंच. असल्या वृत्तिची पैदास करणारा ज्ञातिभेद हेंच मुळीं राष्ट्रीय पातक नव्हे काय ? अर्थात् तुझें स्वातंत्र्य स्वार्थलोलुप असूं नये, तें द्वेषातीत असलें पाहिजे; आणि जर तें तसें असेल, तरच तूं सर्वांभूतीं प्रेम करूं शकशील. तुझें परिणत होणारें स्वातंत्र्य विधात्यानें संलग्न केलेल्या संबंधरज्जूंचें उच्चाटण करण्याकरितां नसून, सामर्थ्यबंधनापेक्षां अधिक समर्थ अशा प्रेमबंधनानें बद्ध होण्याकरितांच होय. मग तुझ्या स्वातंत्र्यप्राप्तीचा खरा अर्थ काय ? पूर्व आणि पश्चिम या दोहोंत विरोध वाढविणें हा खरा हेतू नसून, त्यांत समीपता व सायुज्यता उत्पन्न करणें हाच मुख्य हेतू होय. पश्चिमेकडील एखाद्याच देशाशीं नव्हे, तर सरसकट सर्व राष्ट्रांशीं मैत्री करणें हाच तुझ्या स्वातंत्र्याचा तत्वार्थ होय. दुसऱ्यांच्या बंधनांत न रहातां तुला स्वतंत्र व्हावयाचें असेल, तर ‘ सेवाधर्म ’ हाच तुझा खरा उद्देश असावयास पाहिजे. आपली मर्यादित सीमा उल्लंघून ज्यांना स्वतंत्र होण्याची इच्छा आहे, त्यांचा मित्र व मदतगार म्हणून तुला बाहेर जावयाचें आहे. गुलामींत राहून दुसऱ्यांस गुलाम करण्याकरितां नव्हे.

मृत्यूचें आयुध म्हणून नव्हे तर प्रेमी प्रवासी ( परिव्राजक ) बनण्याकरितां, तसेंच आत्मयज्ञाचा अनुभव अलमदुनियेला देण्याकरितां म्हणून तूं स्वतंत्र झालेंच पाहिजे.

जगतितलावरील दुःखापदांचे करुण विलाप नीट ऐकून घे; हें भोक्तृत्व पाहून अश्रूपतन होऊं दे. हें जग अज्ञानांधःकारपूर्ण आहे. त्यांस धीर दिला पाहिजे. सर्व जगाला प्रकाशित करावयाचें आहे. सर्वत्र शांततेचें साम्राज्य प्रस्थापित करावयाचें आहे. कारण अज्ञानांधकाराच्या दारुण गुहेंतून बाहेर पडून, स्वर्गीय सुखाचा आस्वाद घेण्याचें हिंदुस्थान हें एक संकेतस्थानच होय. प्रत्येक युगानें हेंच सिद्ध केलें आहे. प्रत्येक युगांत ज्या मानानें अज्ञान वा कृष्णत्व जास्त, त्या मानानें त्या युगांतील अवतार देखील अधिक तेजस्वी व करूणरूप असतात.

आज या कलियुगांत पाताळांतून एक महाप्रचंड राक्षस वर आला आहे. हे भारता ! अंतर्क्य, अनावर्त अशा प्रेमाचें आगमन तूंच जगाला जाहीर कर, आणि स्वतःचाहि उद्धार करून घे !

---

# जाति–समता–संघ.

## संघाचा उगम.

वरील संघाचा उगम गत जगड्व्याळ युद्धापासून आहे. ह्या युद्धांत सर्व जातीच्या लोकांनीं आपल्या रक्ताचे सडे शिंपडले आहेत. शक्तिमदानें धुंद झालेल्यास शेवटीं लीन–गरिब अशा लोकांपुढें मदतीच्या अपेक्षेनें मान वांकवावी लागली आहे. ज्या युद्धांत सर्व सुधारणावादांचा हलकल्लोळ उडाला; एकाचा नाश तर दुसऱ्याचा उद्धार–जो रणसंग्राम सर्व जातींच्या लोकांचा एकमेकांकडूनच नाश करविता झाला; त्या युद्धाच्या ह्या अन्योन्य कत्तलखान्यांत लोक एक गोष्ट मात्र शिकले. ती ही कीं, मजबूत घटनाशक्ति उत्पन्न करून, लहान मोठ्या सर्व राष्ट्रांचा मान संभाळला जाईल, अशा समतेच्या पायावर चिरकालीन तह घडवून आणणें.

जाति–समता–संघाचें उत्पादन प्रथम जपाननेंच केलें आहे. जेव्हां पॅरिस येथें शांतता–परिषद भरविण्याचें ठरलें, तेव्हांच जपानी राष्ट्रांतील मोठमोठ्या वजनदार संस्थांचें सदतीस प्रतिनिधी वरील शांतता परिषदेंत जमावरील गांजलेल्या लोकांतर्फे त्यांच्या प्रतिनिधिंनी हक्क संवर्धना-विषयींच्या आणलेल्या ठरावास दुजोरा देण्यासाठीं एकत्र जमले होते.

ह्या प्रथमाधिवेशनांतच वरील जाति–समता–संघाची स्थापना एम. टेइचिसुगिता यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. सदर गृहस्थ तेथील हाउस ऑफ पिर्सचे माजी अध्यक्ष आणि सभासद होत. अध्यक्षांनीं वरील सभेंत पास झालेला जो ठराव शांतता परिषदेकडे पाठविला, तो असाः—

“ शांतता परिषदेंत राष्ट्रसंघ स्थापन करण्याचा प्रयत्न करण्याच्या व जगावर कायमची शांतता प्रस्थापित करण्याच्या हेतूनें सर्व दोस्त राष्ट्रांनीं एकत्र जमण्याचें ठरविलें आहे. ह्या हेतूस आम्ही जपानी लोक अंतःकरणपूर्वक दुजोरा देत असून त्यास मिळणाऱ्या मान्यतेची अत्यंत उत्सुकतेनें मार्ग प्रतिक्षा करीत आहोंत ” ( टोकियो ता. ११ फेब्रुआरी १९१९ ) ‘ तथापि ज्या अर्थी अंतरराष्ट्रीय दळणवळणाच्या कारभारांत जातिविषयक भेदभाव दृष्टीस पडतात, व हे भेदभाव, समता व स्वातंत्र्याच्या तत्वाविरुद्ध असून, त्यापासून जाती जातींत लढ्याचें बीज उत्पन्न होणें साहजिक आहे; आणि जो पावेतों ही स्थिती कायम आहे तों पावेतों तरी असल्या शांतता परिषदा, संघ, वा तह हीं सर्व हवेंतील किल्ल्याप्रमाणें काल्पनिकच होत. अशापासून खऱ्या शांततेची अपेक्षा केव्हांहि करतां येणें शक्य नाहीं, त्या अर्थी आह्मीं जपान देशांतील मोठ-मोठ्या वजनदार संस्थांचे सदतीस प्रतिनिधी सर्व राष्ट्रांस, मानव जातीच्या न्याय्य व समतेच्या तत्वावर कायमचा तह घडवून आणण्यास आव्हान करीत आहों. पुढें आम्हीं असेंहि ध्वनित करितों कीं, शांतता परिषदेनें जाति जाति मधील सर्व तंट्यांचा व अपात्रतेचा कायमचा बिमोड करावा अशी जपान अपेक्षा करित आहेः—

वरील लीगनें आपल्या ता. २३ माहे मार्च १९१९ च्या दुसऱ्या बैठकींत शांतता परिषदेच्या कार्यक्रमाविषयीं विचार करून खालील ठराव त्या परिषदेच्या अध्यक्षांस कळविला. 'ज्या संघाची उभारणी जातिभेदावरच झालेली आहे, अशा कोणत्याही राष्ट्रसंघास जपान तीव्र विरोधच करितें.'

संघाच्या प्रयत्नांची खातरजमा न बाळगितां जपानी प्रतिनिधींनीं मूळ ठरावांवर जातीविषयक प्रश्नासंबंधीं उपसूचना ही आणिलीच; परंतु शेवटीं तिची पूर्वसंकेतानुसार कशी विल्हेवाट लागली हें सर्वश्रुत आहेच: बहुमताचें पारडें जरी विरुद्ध बाजूस झुकलें, तरी पण ती उपसूचना नामंजूर केल्याचें जाहीर करण्या इतकेंहि धाडस अध्यक्ष मि. विल्सन् यांस झालें नाहीं; त्यांनीं अशी एक मल्लिनाथी मात्र झोकून दिली कीं, अशाप्रकारच्या ठरावास एकमताचा पाठिंबा मिळाला पाहिजे; अशा रीतीनें त्यांनीं आपली बाजू सांवरून नेली.

ह्या अडचणीमूळें वरील समता-संघानें-पॅरिसच्या शांतता परिषदेकडे खालील निषेधात्मक ठराव पाठविला:—"आम्हीं राजकीय, धार्मिक, मुद्रणकलाभिज्ञ सैनिक, आरमारी, इत्यादि सर्व प्रकारच्या अनेक संस्थांचे सद्‌तीस प्रतिनिधिनीं ता. २४ एप्रिल १९१९ रोजीं भिन्नभिन्न जातिंमधील वैमनस्याचा विचार करण्याकरितां पुन्हां तिसरी बैठक भरविली. सदर बैठकींत खालीलप्रमाणें ठराव पास झाला आहे:—

"जाति वैमनस्याच्या पायावरच ज्या राष्ट्र-संघाची उभारणी केली जात आहे, त्या संघांत सामिल न होण्याचा जपानी राष्ट्रानें आपला पूर्वींचा निश्चय फिरून कायम केला आहे." ह्याहि गट्टीफुःच्या प्रयत्नाला यश आलें नाहींच; तथापि त्यामुळें नाउमेद न होतां उपरिनिर्दिष्ट संस्थांस एक प्रकारचा नूतन जोमच आला आहे. वरील संस्थेस अचल व संघटनात्मक स्वरूप देऊन, तिचा प्रसार सर्व देशांतून करावा असा निश्चय जाति-समता-संघानें केला आहे. संघाचा तुटकपणा हाच त्याच्या अशक्ततेचें कारण; परंतु एशियांतील-नव्हे-जगावरील सर्व जातींच्या एकजुटीनें त्यास नवजीवन प्राप्त होऊन शेवटीं त्याचाच विजय होणार.

वरील संघाच्या उत्पादकाच्या विनंतीवरून मी त्यांच्या जपान येथील कार्यांत इतक्या सलगीनें मिसळलों आहे. आणि येथें—ह्या भारतवर्षांत माझ्या हिंदी मित्रांच्या सहाय्यानेंच त्या जाति—समता—संघाची संस्थापना करण्याचेंहि मीच त्यांस अभिवचन दिलें आहे.

## —ह्या संघाचे सर्व साधारण हेतु—

( १ ) सर्व जातीं व वर्णांच्या लोकांमध्यें लोकशाहीच्या तत्वांचा प्रसार करणें.

( २ ) हक्कांचें समत्व आणि समतेचे हक्क—हे हक्क व्यक्तीगत नसून, मानवी जातिच्या सर्व लोकांना सारखेपणाचेच असावेत असें ध्वनित करणें.

( ३ ) सर्व पंथांच्या, मतांच्या व वर्णांच्या लोकांचा, मानवी दर्जाविषयीं सारखेपणाचा सन्मान प्रस्थापित करणें; आणिः—

( ४ ) त्या योगानें सुशिक्षित व अशिक्षित, पुढारलेले व मागासलले, ह्या सर्वांची सारखीच प्रगती—अर्थात् एकाचा फाजील अभिमान व दुसऱ्याची लीनता हीं दूर करून, तसेंच परस्पर बंधुप्रेम व समंजसपणाच्या अभावि ज्या पाशविकतेची परमावधि झालेली आहे, तीहि दूर करून ही अपेक्षित प्रगति घडवून आणणें.

## —एशियाकरितां—

१—सर्व जाती व वर्णांच्या लोकांच्या सौख्याची उभारणी एकाच सर्व साधारण समजुतीच्या पायावर करून, एशियाचें आध्यात्मिक व भौक्तिक ऐक्य घडवून आणणें.

२—अंतर—देशीय संबंधांना अधिक दृढमूल करून, एशियांतील सर्व राष्ट्रांचा एक संघ व कॉंग्रेस हीं निर्माण करणें, आणि—

( ३ ) एशियांतील सर्व जातींच्या सौख्यपूर्ण हित—संबंधाच्या स्वतंत्र वाढीशी सहानुभूती ठेवून, त्यांचे जगावरील अन्य जातीय वा वर्णीय लोकांशी हितसंबंध जुळवून आणणें.

**भारताकरितां**

( १ ) आपल्या साम्राज्यांतर्गत जातिसमतेच्या हक्काचें समर्थन करण्याची अधिक दृढ साधनें हिंदुस्थानच्या विशिष्ट तत्वांची अखिल मानव जातिच्या महदैक्याशीं सांगड घालून-जुळवून देणें;

( २ ) समुद्रांतरींच्या वसाहतींतून वसाहत करून राहिलेल्या हिंदी लोकांच्या सुखसाधनांवर देखरेख ठेऊन त्यांस अहर्निश मदत देणें, आणि स्वसंरक्षणाचीं प्रत्यक्ष साधनें उपलब्ध करून देणें.

**संघटनाः—**

सदर संघाच्या शाखा, व्यक्तिशः सभासद, आणि संस्था यांच्या संमतिनेंच उघडण्यांत आल्या आहेत. हिंदी शाखेस लागणारीं साधनें एक आकडी देणग्या, व नियमित क्रमानें वर्गणी गोळा करून जमविण्यांत येतील.

संघाचा कारभार कार्यकारी मंडळ नेमून, तसेंच संघाच्या बीजभूत अशा संस्थांच्या प्रतिनिधींचें एक मंडळ नेमून हिंदुस्थानांतच चालविण्यांत यावा.

वरील संघाच्या उद्देशप्रसारार्थ व संघ विस्तारार्थ एक अंतरराष्ट्रीय संघ स्थापन करण्यांत आला आहे. ह्या संघाचा खर्च त्या त्या भागानें आपापल्या ऐपतीप्रमाणें पैसा गोळा करून चालवावा.

जाति-समता-संघाच्या निरनिराळ्या भागांकडून संघाच्या उद्दिष्ट हेतूंना संमतिदर्शक म्हणून खालील प्रतिज्ञा घेण्यांत यावीः—

प्रतिज्ञाः—सर्व काळांनीं आणि सर्व जातींच्या लोकांनीं लिहून ठेविलेल्या इतिहासाच्या नांवानें,—ज्या इतिहासानें अनेक मानवी कुटुंबाचा उत्कर्षापकर्ष, उदयास्त, आणि कालचक्रानुरोधानें उदयमान होणारें मानवी प्रगमन, हीं दाखविलीं आहेत—त्या इतिहासाच्या नांवानें; तसेंच सृष्टीविषयक सुधारणेचें केवळ कन्यारूप असें—मानव जातीची उत्पत्ती परस्परांपासूनच होय ही गोष्ट शिकविणारें, स्थलीं स्थलीं उत्पन्न होऊन, वृद्धिंगत होत जाणाऱ्या चैतन्य-तेजाची माहिती उपलब्ध करून देणारें,

आणि ह्या भिन्न भिन्न मानव जाती, आपलें रक्तमिश्रण व विचार एकीकरण करीत आल्या आहेत, ही गोष्ट प्रतिपादन करणाऱ्या शास्त्रांच्या नांवानें; तसेंच धर्मांचें स्मरण करून—ज्या धर्मांत निरनिराळ्या जातींतील नेते, क्रांतिकारक, सुधारक, व साधुवर्य निर्माण झाले; आणि जे धर्म हींच तत्वें शिकवित आहेत कीं:—

( १ ) समष्टिरूप अशा एकच तत्वाचें हें जग ह्मणजे लोकशासनच होय. ( epicteclus conversations १४–२४ )

( २ ) निरनिराळ्या भूतमात्रांच्या ठिकाणीं एकच नित्य व अभेद्य स्वरूप असतें. ( भगव. १८–२० )

( ३ ) आम्ही एकमेकांचे संबंधीच होत ( Epistle Romans १२–५ )

( ४ ) तुम्हां सर्वांची उत्पत्ति एकमेकांपासूनच आहे. ( कुराण )

( ५ ) शेजाऱ्यावर देखील स्वतःप्रमाणेंच प्रेम करावें. ( Confucius. Lun. yu. I. १४–५ )

( ६ ) आपण स्वतः करितां जें जें व जसें करतों, तें व तसेंच दुसऱ्यांकरितांहि करीत असावें. ( धम्यपद् १२९ )

( ७ ) पांचखंड—एक कुटुंब. ( चिनिबुद्ध–लेख )

एकात्मनेन समष्टिरूप अशा मानव्याच्या नांवानें—एका—शरीराला इजा झाली तर सर्व आत्म्यांना त्या दुःखाची कळ येणार; जें भिन्नत्वानें नटलेलें आहे; जें अंतर्गत जातींच्या भरींवपणानेंच मजबूत झालेलें दिसतें; त्या स्वाकृतीच्या स्वातंत्र्योत्कर्षांत प्रगमनशील अशा मानवांच्या नांवानें—आणि मानवि शांततेच्या नांवानें—( कारण परस्पर सन्मानाभावीं खरी शांतता नांदणें शक्य नाहीं. ) तसेंच सर्व तर्कशास्त्राच्याहि नांवानें—जें तर्कशास्त्र ऐक्योत्पादक आहे; ऐक्याचें आत्मारूप आहे, अर्थात् जो आत्मा प्रेममूलक असतो, त्या सर्वांच्या नांवानें आम्हीं असें जाहीर करितों कीं, आम्हीं मानव-जातीच्या विश्वव्यापक समतेचे पुरस्कर्ते आहोंत.

REFBK-0002042